# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती/२०२१-२२/(७५६०/२१)/शिष्यवृत्ती/3740 दिनांक : ०८.१०.२०२१

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२१-२२ करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१.

३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दि. २१ सप्टेंबर, २०२१.

४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक दि. २२.०९.२०२१.

५. मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं-२०२१/परदेशी शिष्यवृत्ती योजना/१०९१९ दि. ६.१०.२०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ४.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागातील खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदिवका व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी, THE ( Times Higher Education)/ किंवा QS ( Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४.१.२०२० अन्वये करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यात आली नव्हती. तरी, सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

Scanned with CamScanner

सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावरून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या लाभासाठी उमेदवाराच्या व त्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रु. ८.०० लाख इतकी करण्यात आलेली आहे.

**सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या एका इंग्रजी व एका मराठी वर्तमानपत्रातील सर्व आवृत्त्यांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.**

इच्छुक उमेदवारांनी **www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी विभागीय कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) घेऊन येणार आहेत. संपूर्ण माहितीसाठी संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालय/संस्था / विद्यापीठ स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.

२. आपल्या महाविद्यालयाच्या / संस्थेच्या /विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३. महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसॅप गृप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच संस्थेंतर्गत संचालित सर्व वॉटसॅप गृप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसॅप गृप वर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

४. सर्व समाजमाध्यमांकडून (**Social Media**) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयूब वरुन जाहिरात प्रसारित करावी.

५. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे कळवून सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

तरी आपणांस कळविण्यात येते की, अर्ज तपासणी व स्वीकृती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात दि. २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीमध्ये उपस्थित रहावे.

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत – **उपरोक्त नमूद सर्व सहपत्रे.**

प्रत - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in
E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९
फॅक्स ०२०/२६१११११५३

क्र. उशिसं-२०२१/परदेशी शिष्यवृत्ती योजना/ १०८९८
दिनांक ६/१०/२०२१
6 OCT 2021

**तात्काळ इमेलद्वारा**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषयः- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२१ - २२ करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भः**-१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांकः संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.२१८/ ताशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ताशि-४, दि.१२/११/२०१८.

३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४ , दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१.

४) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दि.२१/०९/२०२१

५) संचालनालयाचे क्र.उशिसं-२०२१/परदेशी शिष्यवृत्ती योजना/१०६०६, दि. २७.०९.२०२१

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका व पीएच.डी अभ्यासक्रमांसाठी THE (Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदर योजना संदर्भाधिन क्र.३ च्या दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे, मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१(प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या लाभासाठी उमेदवाराच्या व त्याच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रु. ८.०० लाख इतकी करण्यात आलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी www.foreignscholarship२०२१.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ आक्टोंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच उमेदवारांनी online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या सांक्षांकीत प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचे कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोंबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) जमा करणे आवश्यक आहे.

तरी आपल्या स्तरावरुन संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद कालावधीमध्ये ऑनलाईन अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करावी. याकरीता आवश्यक लॉगीन आयडी व पासवर्ड आपणास दि. २३.०९.२०२१ रोजीच्या ई-मेल द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करण्यासाठी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, सुचना पत्रक, संदर्भीय शासन निर्णय व जाहिरातीची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने या संचालनालयाच्या संदर्भिय दि. २७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि अद्यापही आपल्यांकडून योजनेची व्यापक प्रसिध्दी बाबत कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

तरी सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करणेबाबत पुनःश्च कळविण्यात येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.
२) आपल्या कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईटवरुन सदर योजनेचे माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३) आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुपवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच त्यांना त्यांच्या संस्थेंतर्गत संचलित सर्व वॉटसअप ग्रुप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुपवर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.
४) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयूब, वरुन जाहिरात प्रसारित करावी.

तसेच आपल्या अंतर्गत येणाऱ्या सर्व अकृषि विद्यापीठे, संस्था, शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. तसेच सदर योजनेचे पोस्टर तयार करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यात यावे. तसेच आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये, संस्थांनाही सदरचे पोस्टर लावण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात. तसेच प्रवेशाच्या कामासाठी प्रत्यक्ष भेट देणाऱ्या विद्यार्थी व पालकांना याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

**(डॉ. धनराज माने)**
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रतः १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव.
२) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ , महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१ यांना माहितीस्तव.

प्रत :- मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई 32. यांना माहितीस्तव.

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. परदेशी शिष्यवृत्ती/२०२१-२२/(७०४१/२१)/शिष्यवृत्ती/ ३८५५ दिनांक : २२.०९.२०२१

**परिपत्रक**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती निवडीसाठी सन २०२१-२२ करिता अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : - १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१.
३. तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दि. २१ सप्टेंबर, २०२१.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ४.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागातील खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदविका व पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी, THE ( Times Higher Education)/ किंवा QS ( Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४.१.२०२० अन्वये करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यात आली नव्हती. तरी, सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावरून सुरु करण्यात आलेली आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात येत आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या लाभासाठी उमेदवाराच्या व त्यांच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रु. ८.०० लाख इतकी करण्यात आलेली आहे.

**सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या एका इंग्रजी व एका मराठी वर्तमानपत्रातील सर्व आवृत्त्यांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.**

**इच्छुक उमेदवारांनी www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जांची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी विभागीय कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) घेऊन येणार आहेत. संपूर्ण माहितीसाठी संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.**

**सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून महाविद्यालय/संस्था / विद्यापीठ स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

**१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.**

**२. आपल्या महाविद्यालयाच्या / संस्थेच्या /विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.**

**३. महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसॅप गृप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच संस्थेंतर्गत संचालित सर्व वॉटसॅप गृप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसॅप गृप वर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.**

**४. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयूब वरुन जाहिरात प्रसारित करावी.**

**५. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन परिपत्रकाद्वारे कळवून सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.**

**तरी आपणांस कळविण्यात येते की, अर्ज तपासणी व स्वीकृती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे या कार्यालयात दि. २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीमध्ये उपस्थित रहावे.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

सोबत — **उपरोक्त नमूद सर्व सहपत्रे.**

प्रत - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

२. डॉ. अभय वाघ, तंत्रशिक्षण संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई ४००००१. यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९/४४९/४९३

ई-मेल–desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६६ दिनांक : २० सप्टेंबर, २०२१

## "जाहिरात"

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील **खुल्या प्रवर्गातील** ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल, अशा विद्यार्थ्यांकरीता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४.१०.२०१८ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येते. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४-५-२०२० अन्वये करण्यांत आलेल्या उपाययोजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यांत आली नव्हती. तरी, सदर योजना शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दि.६-९-२०२१ अन्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

**सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत येत आहेत.**

या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा / अभ्यासक्रम निहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवी | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | **१०** | **१०** | **२०** |

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यांत येत आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत :

- उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेश घेतलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२१ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२०-२१ मधील) **एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.**
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यांत येईल.

इच्छुक उमेदवारांनी **www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **संकेतस्थळावर** online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | दि. २१ सप्टेंबर २०२१ पासून<br>दि. १८ ऑक्टोबर २०२१<br>( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |
| २ | • ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>• ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | दि. २३ सप्टेंबर २०२१ पासून<br>दि. २० ऑक्टोबर २०२१<br>( सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Online **अर्जाशिवाय इतर कोणत्याही पध्दतीने केलेला अर्ज विचारात घेण्यांत येणार नाही.** इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९९४१९
ई-मेल- desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६४ दिनांक : 21 SEP 2021

प्रति,
मा.संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
पुणे.

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ४ ऑक्टोबर, २०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ६ सप्टेंबर, २०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यांत आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४-५-२०२० अन्वये करण्यांत आलेल्या उपाययोजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यांत आली नव्हती. तरी, सदर योजना संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यांत येत आहे, मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील. तसेच सदरच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या लाभासाठी उमेदवाराच्या व त्याच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रु. ८.०० लाख इतकी करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या एका इंग्रजी व एका मराठी वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी **www.foreignscholarship2021.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी आपल्या विभागीय कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) घेऊन येणार आहेत. याकरीता आपण आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व विभागीय सहसंचालक कार्यालयांना याबाबत पत्राव्दारे अवगत करुन त्यांचे स्तरावरुन संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करुन व त्यामधील तरतुदींबाबतची माहिती अवगत करुन उपरोक्त नमूद कालावधीमध्ये ऑन लाईन अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करावी.

याकरीता आवश्यक लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्या सहसंचालक, विभागीय कार्यालयांस ई-मेल द्वारे कळविण्यात येतील. तसेच अर्जाची तपासणी व अर्ज स्विकृती करण्यासाठी मार्गदर्शनपर माहिती पुस्तिका, सूचना पत्रक, संदर्भीय शासन निर्णय व जाहिरातीची प्रत सोबत जोडलेली आहे.

आपणांस असेही कळविण्यांत येते की, आपल्या स्तरावरुन आपल्या अंतर्गत येणाऱ्या सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालयांना सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीकोनातून एक पत्रकार परिषद आयोजित करुन, याबाबतची बातमी सर्व स्थानिक वर्तमानपत्रातून तसेच रेडिओवरुन प्रसिध्द करण्याविषयी सूचित करण्यांत यावे. तसेच सदर योजनेचे पोस्टर तयार करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावण्यांत यावे.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालयांमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.
२. आपल्या कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईट वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३. आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच त्यांना त्यांच्या संस्थेंतर्गत संचलित सर्व वॉटसअप ग्रुप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत सूचना देण्यांत याव्यात.
४. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, वरुन जाहिरात प्रसारित करावी.
५. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

तरी आपणांस कळविण्यांत येते की, दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ ते २० ऑक्टोबर, २०२१ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) या कालावधीत अर्ज तपासणी व स्विकृती करुन सर्व अर्ज एकत्रित करुन **दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत** तंत्रशिक्षण संचालनालयास हस्तदेय जमा करण्याबाबत संबंधितांना आपले स्तरावरून स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

सहपत्रे :- वरीलप्रमाणे

आपला

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.

D:\Desk-19\Mali\Foreign Scholarship-2021-22\Foreign Scholarship-letter.doc

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती"

## या योजनेंतर्गत सन २०२१-२२ करीता

# माहिती पुस्तिका


तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९/४४९/४९३

ई-मेल- desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना

सन २०२१-२२

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ओळख | ३ |
| २ | योजनेचे नांव व सुरुवातीचे वर्ष | ३ |
| ३ | योजनेचा उद्देश व व्याप्ती | ३ |
| ४ | सर्वसाधारण  अटी व शर्ती | ३ |
| ५ | वयोमर्यादा | ४ |
| ६ | उत्पन्न मर्यादा | ४ |
| ७ | शैक्षणिक अर्हता | ५ |
| ८ | अभ्यासक्रमाचा कालावधी | ५ |
| ९ | एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक | ५ |
| १० | अनिवार्य अटी | ५ |
| ११ | शिष्यवृत्तीची शाखानिहाय विभागणी व परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम | ७ |
| १२ | विद्यार्थ्यास मिळणारे लाभ | ९ |
| १३ | अर्ज करण्याची पध्दत | १२ |
| १४ | गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती | १४ |
| १५ | अन्य अटी व शर्ती | १७ |
| १६ | हमीपत्र व  बंधपत्र | १९ |
| १७ | कायदेशीर बाबी | १९ |
| १८ | छाननी समिती | १९ |
| १९ | निवड समिती | २० |
| २० | ऑनलाइन अर्जात भरावयाची माहिती | २१ |
| २१ | बंध पत्र नमुना | २५ |
| २२ | हमी पत्र नमुना | २७ |
| २३ | विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर करण्यासाठीची कागदपत्रांची चेक लिस्ट | २९ |
| २४ | सह संचालक, उच्च शिक्षण व तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते | ३० |

## १. ओळखः

शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये चालू शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबतची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. या माहिती पुस्तिकेतून योजनेसंबंधी व्याप्ती सविस्तर अटी व शर्ती, पात्रता/अपात्रता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती, अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक कागदपत्रे इत्यादीची माहिती देण्यात येत आहे.

## २. योजनेचे नांव व सुरुवातीचे वर्ष :-

खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" या नावाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रतीवर्षी राबविण्यात येते.

## ३. योजनेचा उद्देश व व्याप्ती :-

महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करणे.

ही योजना खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाची परदेशी शिष्यवृत्ती लागू केली आहे अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रशासनिक विभागाच्या योजनेमध्ये अर्ज करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध मागास प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे विद्यार्थी म्हणून समजण्यात येतील.

## ४. सर्वसाधारण अटी व शर्ती :-

१) दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता अर्ज मागविण्यात आले असून, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यांत येत आहे. मात्र अशा विद्यार्थ्यांपैकी ज्यांची निवड होईल त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वगळता पुढील अभ्यासक्रमाच्या मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय राहील

२) विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

३) विद्यार्थ्याला परदेशातील THE / QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा.

४) विद्यार्थ्यांने पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना, यापुर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्रशासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.

५) अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

६) परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.

७) एक्झिक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झिक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

८) प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.

९) सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्याकरिता लागू राहील.

## ५. वयोमर्यादा :-

दिनांक १ जुलै रोजी उमेदवारांचे वय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी ३५ वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्ष पेक्षा जास्त नसावे.

## ६. उत्पन्न मर्यादा :-

१. **शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ नुसार या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्याच्या व त्याच्या पालकांची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८.०० लाख इतकी करण्यांत आलेली आहे.**

२. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं. १६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदारपेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

## ७. शैक्षणिक अर्हता :-

१. परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

२. पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

३. शासन शुध्दीपत्रक दि. ३०-१०-२०१८ नुसार परदेशातील विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी ही अर्हता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचा पीएच.डी. साठीचा अभ्यासक्रम हा बदलत्या काळातील विशेष संशोधन व वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रम असल्यास असे उमेदवार या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात.

४. पदवी किंवा पदव्युत्तर पदवी हा अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा.

## ८. अभ्यासक्रमाचा कालावधी :-

१. पीएचडी- ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा जो कमी असेल तो

२. पदव्युत्तर पदवी- २ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

३. पदव्युत्तर पदविका- १ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

## ९. एकाच कुटूंबातील कमाल पात्रता धारक :-

१. सदर योजनेचा लाभ एकाच कुटुंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल.

२. एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांना ही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.

३. सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

## १०. अनिवार्य अटी :-

१) नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (organization Employer) ना-हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

२) पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

३) विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक असेल. या प्रत्येक जामीनदाराने स्वतंत्र Surety Bond करुन देणे बंधनकारक असेल.

४) अर्ज करणा-या विद्यार्थ्याचे स्वास्थ्य चांगले असले पाहीजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५) विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापूर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच परदेशात राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दूतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालवधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यांस परवानगी मिळणार नाही.

६) विद्यार्थ्यास शासनाने विहीत करुन दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

७) विद्यार्थ्यांस परदेशामध्ये प्रवेश मिळण्यासाठी THE/किंवा QS World Ranking मधील २०० च्या आतील अद्ययावत जागतिक क्रमवारीत (जाहीरातीच्या वेळी असणारे विद्यापीठाचे रेटींग गृहीत धरण्यात यावे) असलेल्या विद्यापीठ/शिक्षणसंस्था मध्ये प्रवेशासाठी स्वत: प्रयत्न करावा लागेल व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा देणे बंधनकारक असेल.

८) ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

९) विवाहीत उमेदवाराच्या पत्नी व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतुद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणे ही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

१०) नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

११) पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार/विद्यार्थ्याची असेल,

१२) उमेदवारास/विद्यार्थ्यांना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

१३) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

१४) सदर शिष्यवृत्तीच्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

१५) विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा त्यांना नोकरी मिळेल, किंवा तो स्वत:च्या व्यवसाय सुरु करेल किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यापासून दोन वर्षानंतर यापैकी कमी असलेल्या कालावधीपासून त्याच्या शिक्षणासाठी शासनामार्फत जो खर्च करण्यात आला आहे, त्याखर्चाच्या साधारण १०% रक्कम महाराष्ट्र शासनाच्या यासाठी उघडण्यात

आलेल्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा करावी लागेल. जेवढी रक्कम विद्यार्थी जमा करतील तेवढीच रक्कम महाराष्ट्र शासन निधी मध्ये जमा करील व त्याचा विनियोग याच प्रयोजनासाठी करण्यात येईल.

१६) या शिष्यवृत्तीचा लाभ घेवून पूर्ण करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचा लाभ राज्य शासनास होणे या योजनेमध्ये अपेक्षित आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांने महाराष्ट्र राज्यात परत येवून त्याचा अभ्यासक्रमाचा लाभ राज्यास होईल याकरीता आवश्यकतेनुसार राज्य शासनास सेवा देणे अपेक्षित आहे. त्याबाबतचे बंधपत्र लाभार्थी विद्यार्थ्यांकडून घेण्यात येईल.

## ११. शिष्यवृत्तीची शाखा निहाय विभागणी :-

सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | १० | १० | २० |

शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर मुलींची निवड करण्यात येईल.

खालील दिलेल्या पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमांसाठी ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

## परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम.

| **Engineering / Architecture** | **Management** | **Science** | **Arts & Commerce** | **Law** | **Pharamcy** |
|---|---|---|---|---|---|
| *Permissible Courses :- P.G. / P.G. Diploma / Ph.D. | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma/ Ph.D. | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma/ Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma / Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma / Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma / Ph.D |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1.Civil | 1. M.B.A. with Finance / Marketing / H.R. / System Analysis | 1. Agriculture | 1. Sociology | Law | Pharmacy |
| 2.Mechanical | 2. Hotel Management | 2. Horticulture | 2. Psychology | | |
| 3. Electrical | | 3. Animal Husbandry | 3. Philosophy | | |
| 4. Chemical | | 4. General Science | 4. Economics | | |
| 5. Computer | | 5. Maths | 5. Commerce | | |
| 6. Production | | 6. Science | | | |
| 7. Industrial Engg. | | 7. Physics | | | |
| 8. Environmental Engineering | | 8. Chemistry | | | |
| 9. Mining Engg. | | 9. Botany | | | |
| 10. Petrochemical | | 10. Zoology | | | |
| 11. Electronic & TC | | | | | |
| 12. Information Technology/ Information System/ Information Science/Compute r Engineering | | | | | |
| 13. Bio-Technology | | | | | |
| 14. Genetic Engineering | | | | | |
| 15. Nano Technology | | | | | |
| 16. Industry Internet of Things (IIOT) | | | | | |
| 17. Cyber Law/ Cyber Security | | | | | |
| 18. Biomedical Engg. | | | | | |
| 19. Climate Change | | | | | |
| 20. Artificial Intelligence | | | | | |
| 21. Architecture | | | | | |
| **Eligibility** | | | | | |
| Graduation for P.G., P.G.Diploma & Post Graduation for Ph.D. | Graduation in any subject for P.G., P.G.Diploma , Graduation in Hotel Management & Post Graduation in Management for Ph.D. | Graduation for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Concerned Subject for Ph.D. | Graduation for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Concerned Subject for Ph.D. | Graduation in Law for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Law for Ph.D. | Graduation in Pharmacy for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Pharmacy for Ph.D. |

* **Note** :- *Only accredited UniversitiesInstitutions of Foreign Countries will be considered. This is indicative only.*

## १२. विद्यार्थ्यास मिळणारे लाभ:-

परदेशी शिष्यवृती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास खालील लाभ देण्यात येतील.

१) **शिक्षण फी**: परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही केवळ निवड करण्यांत आलेल्या कालावधीसाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत थेट संबधित शैक्षणिक संस्थेस अदा करण्यात येईल.

विद्यार्थ्यांची अंतिम निवड झाल्यानंतर परदेशातील शैक्षणिक संस्थेकडून शिक्षण फीच्या खर्चाचा तपशील विहीत नमुन्यात मागविण्यात येईल व तो प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण फी मंजूर करुन संबंधित शैक्षणिक संस्थेस परस्पर पाठविण्यात येईल. शिक्षण फीचा निधी विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा केला जाणार नाही. विद्यार्थ्यास परदेशात मिळणारी शिष्यवृत्ती, विद्यावेतन, फेलोशिप, शुल्क माफी किंवा इतर लाभ हे देय होणाऱ्या शिक्षण फी मधून वजा करुन उर्वरित निधी शिक्षण संस्थेस पाठविला जाईल.

२) **निर्वाह भत्ता:** प्रवेश घेतलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेल्या अथवा भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च अथवा महाराष्ट्र शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी जाहीर करेल ती रक्कम ही निर्वाह भत्ता म्हणून संबंधित विद्यार्थ्याच्या परदेशातील वैयक्तीक खात्यामध्ये जमा केला जाईल. हा निर्वाह भत्ता परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी देय राहील.

३) विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती, इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमे मधून कपात करण्यात येईल.

४) **विमान प्रवास:** विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रमपुर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जवळच्या मार्गाचा (Shortest Route) दराचा इकोनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा दर दिला जाईल.

सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहीत कालावधीत अभ्यासक्रमपूर्ण केल्यानंतर त्वरीत कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मूळ तिकीट, मूळ बोर्डींग पास, परतीचे प्रवास भाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहीत कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याचा पुरावा इ.कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

५) **वैयक्तिक आरोग्य विमा:** विद्यार्थ्यांस परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा (Personal Health Insurance) काढणे अनिवार्य राहील. यासाठीचा संबंधीत विद्यापीठाच्या निकषानुसार किमान खर्च शासनाकडून अनुज्ञेय राहील.

६) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निर्धारीत दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे हमीपत्र विद्यार्थ्यास व पालकास अर्जासोबत द्यावे लागेल.

७) विद्यार्थ्यास वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था / विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

८) प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilisation Certificate), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही. प्रत्येक सत्र संपलेनंतर त्वरीत विद्यार्थ्यांने शैक्षणिक संस्थेकडे पाठपुरावा करुन आपला शैक्षणिक प्रगती अहवाल / परिक्षेचा निकाल तसेच उपस्थितीबाबतचा अहवाल आणि उपयोगिता प्रमाणपत्र / पोचपावती तात्काळ सादर करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल.

९) अपवादात्मक प्रसंगी, विद्यार्थ्यांनी / पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठ, शिक्षण फी / इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशा वेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर केल्यानंतर, अशी रक्कम विद्यार्थ्यास देय होणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्यांच्या परदेशातील खात्यावर संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे द्वारे जमा करण्यात येईल.

१०) विद्यार्थ्यांने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. या खात्याचा तपशिल त्यांने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्या नंतर तात्काळ संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा. तसेच शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्यास विद्यार्थ्यांने संबंधित बँक खात्याचा तपशिल संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा.

११) परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठाने ऑफर लेटर मध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारीत केलेल्या फी च्या मर्यादेतच लाभ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

१२) खालील बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही :

- i. व्हिसा अर्जावरील खर्च
- ii. विद्यार्थ्याच्या कुटूंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च
- iii. नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षणावरील खर्च
- iv. भाषा प्रशिक्षणावरील खर्च

v. नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त प्रवासाचा खर्च

vi. संशोधन, पुरक शैक्षणीक साहित्य, क्षेत्र भेटी, कार्यशाळा / सेमिनार, आंतरवसियता (Internship) यामधील सहभागाचा खर्च.

vii. संगणक व तत्सम शैक्षणिक साहित्य.

१३) अचानक उध्दवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याचे संबंधित शैक्षणिक संस्था आणि संबंधीत शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

i. जेवढ्या कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढ्या कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

ii. अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाहभत्त्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी हमीपत्र विद्यार्थ्यास द्यावे लागेल.

१४) निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

१५) निवड झाल्यानंतर संबंधीत शिक्षण संचालनालय संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागवेल तसेच या विद्यार्थ्याची गृह चौकशी करण्यात येईल.

१६) संबंधित विद्यापीठाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन त्यानंतर १५ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांना संबंधित परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यकतेनुसार अग्रिम मंजूर करण्यात येईल.

१७) विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेवून आवश्यक ती माहिती व अग्रीम रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र/पोचपावती संबंधित परदेशी शैक्षणिक संस्थेकडून प्रमाणित होऊन प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांस त्या वर्षीचे अग्रिम समायोजित करुन पहिला अर्ध वार्षिक हप्ता अदा करण्यात येईल.

१८) प्रत्येक सहा महिन्याने विद्यार्थ्यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीचे (शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता इ.चे) उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल संचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पुणे यांना सादर केल्यानंतर पुढील ६ महिन्याची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६ महिन्याला विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र / खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यास पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

## १३) अर्ज करण्याची पध्दत :-

१) सदर शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने अर्ज मागविण्यात येतील. इच्छुक उमेदवारांनी या करीताचे जाहीर करण्यात आलेले वेळापत्रका नुसार कार्यवाही करावी. या करिता **www. dtemaharashtra.gov.in/foreignscholarship**2021 या संकेतस्थळास भेट द्यावी.

२) online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

३) इच्छुक उमेदवारांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर जावून शिष्यवृत्तीसाठी online पद्धतीने विहित कालावधीत अर्ज करावा.

४) संकेतस्थळावर online पद्धतीने अचूक माहितीसह भरलेला अर्ज संगणकीय प्रणाली मध्ये निश्चित करावा. तसेच उमेदवाराने आपला नजीकच्या काळातील फोटोग्राफ, स्वाक्षरी व अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे अपलोड करावी.

५) वरीलप्रमाणे संकेतस्थळावर online पद्धतीने अचूक माहितीसह भरलेल्या व संगणकीय प्रणाली मध्ये निश्चित केलेल्या अर्जाची प्रत (Print) व त्यासोबत जोडण्यात आलेल्या आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्र यांच्या साक्षांकित प्रतीसह मूळ प्रमाणपत्र व कागदपत्र यांचे पडताळणी करिता नजीकच्या संबंधित कोणत्याही विभागीय कार्यालयात विहित कालावधीत सदर अर्ज सादर करावा.

६) कला, वाणिज्य, विज्ञान व विधी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती करीता अर्ज असल्यास उच्च शिक्षण विभागाच्या कोणत्याही विभागीय कार्यालयास व व्यवस्थापन, अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी अर्ज असल्यास तंत्र शिक्षण विभागाच्या कोणत्याही विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण या कार्यालयास विद्यार्थी/पालक यांनी सदर अर्ज सादर करावा.

७) अर्ज सादर करण्यास विद्यार्थी स्वत: येवू शकणार नसेल अशा परिस्थितीत तो त्याच्या पालकास किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीस Authority Letter देवून प्राधिकृत करू शकेल.

८) विभागीय कार्यालय अर्जात नमूद केलेल्या माहितीची मूळ प्रमाणपत्रावरून तपासणी करेल व अर्जासोबत सर्व प्रमाणपत्रांच्या व कागदपत्रांच्या प्रती जोडल्या असल्याची खात्री करून प्रत्येक प्रमाणपत्रांच्या प्रतीवर Verified From Original असे प्रमाणित करेल व संगणकीय प्रणालीत अर्जाची निश्चिती करेल.

९) वरीलप्रमाणे अर्जाची तपासणी व संगणकीय प्रणालीत अर्जाची निश्चिती केल्यावर संगणकीय प्रणालीद्वारे तयार केलेली अर्जाची पोचपावती विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी स्वाक्षरी करून एक प्रत अर्जदारास देईल.

१०) विभागीय कार्यालय उमेदवाराचा अर्ज, अर्जासोबतची सर्व Verified From Original असे प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या प्रती, संगणकीय प्रणालीद्वारे तयार केलेली अर्जाची पोचपावतीची संबंधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी असलेल्या दुसऱ्या प्रतीसह एकत्रितपणे यादी करून तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना ३ महापालिका मार्ग, मुंबई येथे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करतील.

११) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.

१२) अपूर्ण भरलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३) अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१४) विभागीय कार्यालयाने प्रमाणपत्रांची पडताळणी केलेलाच अर्ज फक्त विचारात घेण्यात येईल.

१५) THE / QS World University Ranking २०० च्या आतील विद्यापीठाशिवाय इतर परदेशी शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१६) सदर अर्जासोबत विद्यार्थ्याने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सर्व कागदपत्रे स्व-स्वाक्षांकित (Self Attested) असावीत:-

i) विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज,

ii) तहसिलदार पेक्षा कमी दर्जाचे नसेल अशा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला.

iii) विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म नं.१६, व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबांचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदारपेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील अर्थिक वर्षाचे कुटुंबांचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

iv) एस एस सी, एच एस सी, पदविका , पदवी , पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे. ( सनद/मार्कलिस्ट),

**महत्वाची सूचना:**

**गुणपत्रिकेत Grade /GPA इत्यादी स्वरुपात नोंद असेल तर टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अथवा Grade वरून टक्केवारी काढण्यासाठीचा संबंधित बोर्ड /विद्यापीठ यांनी दिलेला फॉर्मुला सादर करणे आवश्यक आहे. असा फॉर्मुला प्रमाणपत्राच्या ज्या बाजूवर अंकित आहे त्या बाजूची साक्षांकित प्रत सुद्धा अर्जासोबत जोडण्यात यावी. अन्यथा गुणांची टक्केवारी उपलब्ध नाही असे समजण्यात येवून अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.**

v) परदेशातील THE/QS World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट ( Unconditional) ऑफर लेटर, ज्यामध्ये प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाची पूर्ण माहिती, शुल्क रचना ( डीटेल्ड फी स्ट्रक्चर), अभ्यासक्रम टप्पे, अभ्यासक्रमाचा कालावधी आणि मिळणारी शिष्यवृत्ती व इतर लाभाबाबत माहिती नमूद केलेली असावी .

vi) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत. ज्या मध्ये अभ्यासक्रमाचा इंटर्नशीपसह पूर्ण कालावधी नमूद केलेला असावा.

vii) आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे. (अंतिम निवड झाल्यानंतर सादर करावे)

viii) दोन भारतीय नागरीकांचे जामीनपत्र. (अंतिम निवड झाल्यानंतर सादर करावे)

ix) संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.

x) विद्यार्थ्याचे महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

xi) विद्यार्थ्याच्या आई/वडील यांचे अथवा आई,वडील हयात नसल्यास व पालक असल्यास पालकाचे महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

xii) विद्यार्थ्याचे भारताचे नागरिकत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

xiii) विद्यार्थ्याच्या आई/वडील यांचे अथवा आई, वडील हयात नसल्यास व पालक असल्यास पालकाचे भारताचे नागरिकत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

xiv) आधार कार्ड.

xv) घराचा पत्ता सिध्द करणेसाठी रेशनकार्ड / आधार कार्ड / मतदान ओळखपत्र/ लाईट बील / टेलीफोन बील / स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये घराच्या कर भरलेबाबतची पावती / प्रॉपर्टी कार्डचा उतारा या पैकी एक पुरावा.

xvi) पासपोर्टची प्रत.

xvii) व्हिसा ची प्रत .

xviii) GRE / TOFEL / IELTS / GMAT इत्यादी आवश्यक परिक्षा उत्तीर्ण असलेबाबतचा पुरावा.

## १४. गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती :-

१. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी इतर सर्व अटींची पूर्तता होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचे मुल्यांकन खालील प्रमाणे करून त्याचे एकूण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी :

[अ] पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १. | एस एस सी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | एच एस सी /पदविका | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७० पेक्षा जास्त ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | ३० |
| ४. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

[आ] डॉक्टरेट अभ्यासक्रमाकरिता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १. | एस एस सी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | एच एस सी /पदविका | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७० पेक्षा जास्त ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ४. | पदव्युत्तर पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७० पेक्षा जास्त ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ५. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ४० |
| | | ५१ ते १०० | ३० |
| | | १०१ ते १५० | २० |
| | | १५१ ते २०० | १० |

२. संबंधित दिनांक ०४ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या **"परिशिष्ट-अ"** प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. त्यामुळे, निर्धारीत केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथमत: वरील **"अ"** व **"आ"** करीता दोन स्वतंत्र एकत्रित गुणवत्ता याद्या तयार करण्यात येतील.

३. अ) गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी THE व QS World Ranking Average जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात येईल.

ब) त्यानंतरही समसमान गुण असल्यास पदव्युतर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता पदवी अभ्यासक्रमाचे आणि पीएच. डी. अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरिता करिता पदव्युतर पदवी अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात येतील .

क) त्यानंतरही समसमान गुणवत्ता असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास वरचे स्थान देण्यात येईल.

४. गुणवत्ता यादीमध्ये समसमान गुणवत्ता असलेल्या अभियांत्रिकी व विज्ञान या शाखेच्या प्रकरणी वरील ३ ब) व ३ क) चा विचार न करता या विद्यार्थ्यांची निवड करताना Emerging areas of science and technology चा प्राधान्याने विचार केला जाईल. उदा. Atmospheric sciences, Adaptation and mitigation of Climate Change, Automation and Artificial Intelligence, Renewable Engergy, Energy Efficiency Techniques, Biotechnology, Nano Technology, Industry Internet of Things, Basic Analytics इ. अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

५. गुणवत्ता याद्या तयार केल्यानंतर शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ प्रमाणे शाखानिहाय पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल. ही निवड करताना एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये ३०% विद्यार्थिनींची निवड करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवड यादीत निर्धारित प्रमाणात विद्यार्थिनींचा समावेश होत नसल्यास संभाव्य निवड यादीतील उतरत्या क्रमानुसार शेवटच्या विद्यार्थ्याऐवजी त्याच शाखेच्या विद्यार्थिनीची निवड करण्यात येईल. ही कार्यवाही करीत असतांना अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र शाखेकरीता एकापेक्षा जास्त विद्यार्थिनींची निवड होणे अपेक्षित नाही.

६. पदव्युत्तर पदवी / पदविका अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पीएच.डी. अभ्यासक्रमाच्या जागेवर गुणवत्ता यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

७. पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या जागेवर गुणवत्ता यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

८. तथापि, त्यानंतरही पदव्युत्तर अभ्यासक्रम/डॉक्टरेटसाठी विहीत करण्यात आलेल्या जागेवर पुरेशा संख्येने विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास / पात्र न ठरल्यास शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ मधील उतरत्या क्रमवारीनुसार लगतच्या शाखेतील जागा (Vertical Interchange) भरण्याचे अधिकार निवड समितीस राहतील. मात्र, त्यासाठी गुणवत्ता यादीतील जेष्ठता हा निकष कायम असेल.

## १५. अन्य अटी व शर्ती :-

१. परदेशात अभ्यासक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्याने दोन महिन्याच्या आत संचालक, तंत्रशिक्षण यांना अंतिम परिक्षेचे गुणपत्र, प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल व पदवीदान समारंभाचे छायाचित्रासह माहिती सादर करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय विद्यार्थ्यास अंतिम विमान प्रवास व इतर लाभ दिले जाणार नाहीत.

२. अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास व्हिसा मुदतवाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यास अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

३. ज्या विद्यापीठामध्ये /शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे, ते विद्यापीठ/ शैक्षणिक संस्था ही त्या देशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/शैक्षणिक संस्था असावी. (Acccredited Universtiy/Institute) या सबंधीची कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी. या बाबत काही वाद निर्माण झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्त यांचे कडून खात्री करुन निवड समिती त्याबाबत निर्णय घेईल.

४. अर्जात नमूद केलेल्या विद्यापीठात अभ्यासक्रमासाठी काही कारणास्तव विद्यार्थी प्रवेश घेवू शकत नसल्यास, त्याच विद्यापीठात त्याच अभ्यासक्रमासाठी पुढील एका सत्राचा (६ महिन्याचा) कालावधी, कोणतेही अतिरीक्त शुल्क न आकारता संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने विनाअट वाढवून दिल्यास आणि विद्यार्थ्याने त्यासाठी सबळ कारण/पुरावा सादर केल्यास अशी मुदतवाढ देण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना असतील. तद्नंतर विद्यार्थ्यास आणखी मुदतवाढ मिळणार नाही.

५. एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. मात्र, सबलीकरण विचारात घेवून अशा बदलास मान्यता देण्याचे अधिकार शासनास राहतील.

६. निवड झालेल्या विद्यार्थ्याला विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ काही अगावू रक्कम भरण्याची आवश्यक असल्यास, अशा आगावू रकमेस मान्यता देण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील. मात्र, ही आगावू रक्कम पुढील देय हप्त्यामध्ये समायोजित करण्यात येईल.

७. विद्यार्थ्यांना अर्ज करते वेळी विद्यापीठाकडून मान्य करुन घेतलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमासाठीच्या कालावधीच्या शिक्षण फी, निवास व भोजनखर्च, निर्वाहभत्त्याची जी महिती सादर केली आहे, त्यापेक्षा जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

८. अभ्यासक्रमाच्या कालावधी व्यतिरीक्त कोणत्याही परिस्थतीत वाढीव कालावधीच्या व्हिसासाठी मान्यता देण्यात येणार नाही.

९. विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे, याची लेखी माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांना सादर करणे आवश्यक आहे. ही माहिती न देता विद्यार्थी परदेशात गेल्यास त्यास विमान खर्च अनुज्ञेय होणार नाही.

१०. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, वर्तणूक, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तद्नुषंगिक बाबींचा अहवाल परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल.

११. अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यानंतर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार संचालनालयामार्फत केला जाणार नाही, अथवा विद्यार्थी /पालक यांचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१२. परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) TOEFL (Test of English as a foreign language), IELTS (International English Language Testing System) इ. प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत, त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.

१३. विद्यार्थ्याने शिष्यवृत्तीसाठी अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रम त्यांचा कालावधी आणि खर्चाचे तपशिल यामध्ये निवड समितीने निवडीची शिफारस केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

१४. काही कारणास्तव विद्यार्थ्यास त्याची निवड होवूनही त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही, तर त्यास वयोमर्यादेच्या अधिन राहून पुढील वर्षी नव्याने अर्ज करण्याची मुभा राहील.

१५. परदेशातील भारतीय दूतावासात राज्य शासनाकडून संबंधित विद्यार्थ्यांचा प्रगती अहवाल, वर्तणूक खर्चाचा हिशोब इ. माहिती पुरविण्याबाबत विनंती करण्यात येईल. तसेच काही विपरीत बाबी असल्यास, परदेशातील भारतीय दूतावास त्या बाबी राज्य शासनास कळवतील. परदेशात प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी मार्गदर्शन व सल्ला देणेबाबत परदेशातील दूतावासास विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना परदेशात काही अडचणी उद्भवल्यास मदत करण्यासाठी या दूतावासास विनंती करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात/शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ तेथील भारतीय दूतावासास संपर्क साधून आपली नोंदणी करावी व त्याचा तपशिल संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावा.

१६. पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने ज्या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे त्याविषयाचा, भारतामध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये अंतिम प्रबंध अहवाल (Thesis) सादर केला नसल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) सादर करणे आवश्यक आहे.

१७. तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जावाढीसाठी आवश्यक असलेले शिथीलीकरण करण्याचे अधिकार यापूर्वीच्या शैक्षणिक वर्षासह संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असतील.

१८. अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही व त्यासाठी अतिरिक्त निधीही दिला जाणार नाही.

१९. तसेच वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील इतर अटी व शर्ती विद्यार्थ्यास बंधनकारक असतील.

२०. निवड झालेल्या विद्यार्थ्याने विभागाने मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे, करारनामे, बंधपत्रे व हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

### खोटी माहिती सादर करणे :-

कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती/कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा शासन निर्णयातील परिच्छेद ९ प्रमाणे कर्तव्यात कसूर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५% चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी/उमेदवाराचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

## १६. हमीपत्र व बंधपत्र:-

विद्यार्थी,पालक व जामीनदार यांना विहित नमुन्यातील रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र व बंधपत्र स्वाक्षरी करून देणे बंधनकारक असेल.

## १७. कायदेशीर बाबी :-

या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवल्यास कायदेशीर बाबीसाठी परदेशातील उच्चायुक्त कार्यवाही करतील.

## १८. छाननी समिती :-

या शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती असेल :-

| | | |
|---|---|---|
| १. | संचालक, तंत्र शिक्षण | - अध्यक्ष |
| २. | सह / उपसचिव,तंत्रशिक्षण किंवा सह / उप सचिव, उच्च शिक्षण | - सदस्य |
| ३. | सहसंचालक, उच्च शिक्षण | - सदस्य |
| ४. | सचिव, महाराष्ट्र राज्य व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे अथवा त्यांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| ५. | आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय,पुणे अथवा त्यांचे प्रतिनिधी | - सदस्य |
| ६. | सहसंचालक, तंत्र शिक्षण | - सदस्य सचिव |

उपरोक्त समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन अभ्यासक्रम निहाय पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेटसाठी गुणवत्ता यादीनुसार पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी पाठवेल.

## १९. निवड समिती :-

उपरोक्त छाननी समितीमार्फत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या यादी/प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी तयार करणेसाठी निवड समितीची रचना खालील प्रमाणे असेल :-

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण - अध्यक्ष
२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त - सदस्य
३. प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता - सदस्य
४. संचालक , तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई - सदस्य सचिव
५. संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे - सदस्य
६. सह/उप सचिव, उच्च शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - सदस्य
७. सह/उप सचिव, तंत्र शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग - सदस्य
८. आयआयटी, पवई, मुंबई या संस्थेचा किमान प्राध्यापक दर्जाचा प्रतिनिधी - सदस्य

---

# " गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " सन २०२१-२२

## - ऑनलाइन अर्जात भरावयाची माहिती -

(सूचना : हा अर्जाचा नमुना नाही. अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.
ही माहिती ऑनलाइन अर्ज दाखल करण्यापूर्वी विद्यार्थ्याने त्याचेकडे तयार ठेवावी)

| अर्जदाराची सर्वसाधारण माहिती:- | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव :- | |
| | वडिलांचे नांव : | |
| | आईचे नांव : | |
| | लिंग : | |
| | राष्ट्रीयत्व : | |
| २ | ज्या अभ्यासक्रमासाठी अर्ज करु इच्छितो तो अभ्यासक्रम — | (PG / PG Diploma /PhD ) |
| ३ | शाखा:- | कला / वाणिज्य / विज्ञान / व्यवस्थापन / अभियांत्रिकी / वास्तुकलाशास्त्र /औषधनिर्माणशास्त्र / विधी |
| ४ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- | |
| ५ | कायमचा पत्ता :- | |
| | भ्रमणध्वनी क्रमांक :- | |
| ६ | विद्यार्थ्याचा प्रवर्ग | खुला / अजा / अज / विजा/भज/ इमाव /विमाप्र |
| ७ | विद्यार्थ्याची जात :- | |
| ८ | विद्यार्थ्याची जन्म तारीख :- | |
| ९ | विद्यार्थ्याचे दि.१.०७.२०२० रोजीचे वय:- | ------ वर्षे |
| १० | विद्यार्थ्याचा ई-मेल :- | |
| ११ | विद्यार्थ्याचा आधार (AADHAR) क्रमांक /नोंदणी क्रमांक:- | (सोबत प्रत जोडावी) |
| १२ | विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे काय ? | (सोबत प्रमाणपत्राची प्रत जोडावी) |
| १३ | विद्यार्थ्याचे पालक महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत काय ? | (सोबत प्रमाणपत्राची प्रत जोडावी) |
| १४ | शैक्षणिक स्थिती/पात्रता माहिती- | |

| परीक्षेचे नांव | उत्तीर्ण अभ्यासक्रमाचे नांव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | उत्तीर्ण झालेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व विद्यापीठाचे नांव | विद्यापीठाचे एकूण गुण | प्राप्त केलेले गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | | |
| HSC | | | | | | |
| पदवी | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पदव्युत्तर पदवी | | | | | | |
| | GRE | | | | | | |
| | TOEFL / IELTS | | | | | | |
| | इतर | | | | | | |

<u>महत्वाची सूचना :</u>

गुणपत्रिकेत Grade /GPA इत्यादी स्वरुपात नोंद असेल तर टक्केवारी दर्शविलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे अथवा Grade वरून टक्केवारी काढण्यासाठीचा संबंधित बोर्ड /विद्यापीठ यांनी दिलेला फॉर्म्युला सादर करणे आवश्यक आहे. असा फॉर्म्युला प्रमाणपत्राच्या ज्या बाजूवर अंकित आहे त्या बाजूची साक्षांकित प्रत सुद्धा अर्जासोबत जोडण्यात यावी. अन्यथा गुणांची टक्केवारी उपलब्ध नाही असे समजण्यात येवून अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १५ | (अ) विद्यार्थ्याचा व्यवसाय | नोकरी / धंदा /बेरोजगार |
| | (ब) नोकरी करीत असल्यास नोकरीचा तपशील:<br>आस्थापनेचे नाव | |
| | (क) हुद्दा /पदनाम | |
| | (ड) अर्जदारास व्यवसाय/नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न | (पुरावा जोडावा) फॉर्म १६ A , Income tax Return |
| | (इ) कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र | ना हरकत प्रमाणपत्र |
| | (फ) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा पत्ता:- | |
| | (ह) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक:- | |
| | (ग) विद्यार्थ्यांच्या कार्यालयाचा ई मेल- | |
| १६ | (अ) वैवाहिक स्थिती- | विवाहित / अविवाहित |
| १७ | विद्यार्थ्याच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती-<br>१.खातेदाराचे नाव-<br>२.बँकेचे नाव-<br>३.बँक शाखेचे नाव-<br>४.खाते क्र.-<br>५.IFSC क्र.-<br>६.MICR क्र.- | Cancelled cheque / Passbook copy जोडावी |
| १८ | पासपोर्ट क्रमांक-<br>जारी दिनांक-<br>वैधता दिनांक-<br>जारी करणाऱ्या कार्यालयाचे ठिकाण | पासपोर्टची प्रत जोडावी |
| १९ | विद्यापीठाचे ऑफर लेटर क्र. व दिनांक- | ऑफर लेटर प्रत जोडावी |
| २० | व्हिसा | व्हिसा ची प्रत जोडावी |
| २१ | अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला आहे किंवा कसे? | होय/नाही |
| २२ | यापुर्वी आपण राज्य किंवा केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतला आहे काय ? | होय/नाही |

| | | |
|---|---|---|
| **अर्जदाराच्या आई /वडील अथवा पालकाची सर्वसाधारण माहिती:-** | | |
| १ | विद्यार्थ्यांच्या आई /वडील अथवा पालकाचे संपूर्ण नांव:- | |
| २ | (अ) विद्यार्थ्याचे आई /वडील अथवा पालकाचा व्यवसाय | नोकरी / धंदा /बेरोजगार |
| | (ब ) आई /वडील अथवा पालकास व्यवसाय / नोकरीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न | (पुरावा जोडावा) फॉर्म १६ , Income tax Return |
| **कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळुन वार्षिक उत्पन्नाबाबतची माहिती:-** | | |
| १ | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे सन २०२०-२१ मधील सर्व मार्गाने मिळणारे एकूण उत्पन्न:-<br>(यामध्ये विद्यार्थी व कुटुंबात इतर व्यक्ती नोकरी अथवा व्यवसाय करीत असल्यास त्यांचे एकत्रित उत्पन्न उत्पन्नाच्या दाखल्यात नमूद करावे व त्याबाबतचे आयकर विवरणपत्र अर्जासोबत सादर करावे.) | १.वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र जोडावे<br>२. आयकर विवरणपत्र जोडावे |
| २ | वडील हयात नसल्यास | वडील हयात नसल्यास मृत्युचा दाखला जोडावा |
| ३ | आई वडील विभक्त असल्यास | आई वडील विभक्त असल्या संबंधीचे न्यायालयाचे संबंधित कागदपत्र जोडावी |
| **विद्यार्थ्याच्या कुटुंबाची माहिती :-** | | |
| १ | विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचा तपशील:- | |

| अ. क्र. | संपूर्ण नांव | वय | विद्यार्थ्याशी असलेले नाते | व्यवसाय | एकूण वार्षिक उत्पन्न | यापूर्वी राज्य/केंद्र शासनाच्या परदेश शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला आहे का? |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |
| ९. | | | | | | |
| १० | | | | | | |
| | | | कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न | | | |

## परदेशातील शैक्षणिक संस्थेतील/विद्यापीठातील प्रवेशाबाबत माहिती:-

| | | |
|---|---|---|
| १ | (अ) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या परदेशातील विद्यापीठाचे नांव:- | ऑफर लेटर जोडावे |
| | (ब ) विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाचे नांव:- | |
| | (क )अभ्यासक्रमाचे स्वरुप (पुर्णवेळ /अर्धवेळ/ online/ Executive) यापैकी कोणते ते नमूद करावे. | |
| | (ड ) अभ्यासक्रमाचा किमान कालावधी:- | |
| | (इ ) विद्यापीठ प्रवेश दिनांक:- | |
| | (फ ) परदेशातील विद्यापीठाच्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता:- | |
| | (ग ) परदेशातील विद्यापीठाचा दूरध्वनी क्रमांक (ISD कोडसह) :- | |
| | (घ ) परदेशातील विद्यापीठाचा ई-मेल:- | |

### ऑफर लेटर/**I-20** नुसार परदेश शिक्षणासाठीचा खर्च:-

| | | एका वर्षाचा खर्च | | संपूर्ण अभ्यासाक्रमाचा खर्च | |
|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांने परदेशातील अभ्यासक्रमासाठी भरलेल्या / भरावयाच्या फी (शुल्क) चा तपशील | विदेशी चलनात | भारतीय चलनात (₹) | विदेशी चलनात | भारतीय चलनात(₹) |
| | शिक्षण फी-<br>परीक्षा फी-<br>नोंदणी फी-<br>जेवणाचा / राहण्याचा खर्च-<br>विमा खर्च-<br>अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला इतर खर्च<br>(तपशील जोडावा) | | | | |
| | एकूण सर्व खर्च- | | ₹ | | ₹ |
| २ | विद्यार्थ्याला खालीलपैकी मंजूर झालेल्या/प्राप्त होणाऱ्या बाबींचा तपशील-<br>१. विद्यापीठातील इतर शिष्यवृत्ती<br>२. Fellowship<br>३. Graduate Teacher Assistance ship<br>४. इतर मानधन<br>५. Campus job/library | | | | |

## " गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी  शिष्यवृत्ती ” योजनेसाठीचे
## -बंध पत्र-
## (₹ १००/- च्या स्टँप पेपर वर विध्यार्थ्याची अंतिम निवड झाल्यावर सादर करावे )

<u>मी/आम्ही</u> बंध पत्र लिहून देणार :-

(१) **विद्यार्थी : संपुर्ण नांव** ------------------------------------------------------------
वय -------------
राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)---------------------------------------------------

(२) **विद्यार्थ्याचे पालक:  पालकाचे नांव** ---------------------------------------------------
वय -------------
राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)---------------------------------------------------

(३) **जामीनदार : जामीनदाराचे नांव** --------------------------------------------------
वय --------
राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)---------------------------------------------------

(४) **जामीनदार: जामीनदाराचे नांव** ----------------------------------------------------
वय --------
राहणार (संपूर्ण पत्ता दूरध्वनीसह)---------------------------------------------------

**" गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी  शिष्यवृत्ती ‼ योजनेअंतर्गत, शिष्यवृत्तीसाठी  मी/आम्ही सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो / करते व हमी देतो ते येणे प्रमाणे,**

१. मी (विद्यार्थी)----------------------------------     सन ---------(वर्ष नमूद करावे) वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी (देशाचे नांव) ----------------------------येथील ------------------------(विद्यापीठ / शिक्षण संस्थेचे नांव व पत्ता) -------------------------------------- ------------------------ येथे (अभ्यासक्रमाचे नांव) ------------ ---------------------------------------------------------------साठी प्रवेश घेतला आहे.

२. मी (पालकांचे नाव)-------------------------------------------(विद्यार्थ्याचे नाव)-------------------------- ----हया विद्यार्थ्यांचा -------------------- (नाते) आहे. मला एकूण ----------------मुले ----------- मुली ---- असून यापैकी आता पर्यंत कोणीही या योजनेचा लाभ घेतलेला नाही.

३. आम्ही विद्यार्थी, पालक व जामीनदार मिळून अशी हमी देतो की, परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेताना ज्या अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मंजूर होईल तो अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी श्री / कुमारी ------------------ -------------------------------- याची राहील. तथापी त्याने/तिने अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनामार्फत खर्च करण्यात <u>आलेली</u> शिष्यवृत्तीची संपूर्ण वसूल पात्र रक्कमेस आम्ही जबाबदार राहू व ती रक्कम शासनास परत करण्याचे **बंधन** आमच्यावर राहील.

४. मी (विद्यार्थ्याचे नाव) -----------------------------------------------------------------अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पुढील <u>दोन</u> महिन्याच्या आत अंतिम परीक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई/ संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य,  पुणे यांना सादर करण्याची तसेच महाराष्ट्र राज्यात  परत येऊन आवश्यकतेनुसार राज्याची  सेवा करणे व माझ्या ज्ञानाचा फायदा राज्याला  करुन देण्याचीही हमी देत आहे.

५. आम्ही याव्दारे कळवितो की, (विद्यार्थ्याचे नाव) ---------------------------------------------------------- यांच्या पालकांचे / कुटुंबाचे व (विद्यार्थी/विद्यार्थीनी नोकरी करीत असल्यास) श्री./ कुमारी -------------------------

-----------------(विद्यार्थ्यांचे नांव) याचे **सन २०२०-२१** या वर्षाचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाख (रुपये आठ लाख) पेक्षा जास्त नाही. तथापी सदरची माहिती खोटी अथवा चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास आम्ही कायदेशीर कारवाईस पात्र राहू.

६. अद्ययावत जागतीक क्रमवारीत असलेल्या २०० च्या आतील (THE World Ranking/ QS World Ranking मधील) परदेशातील विद्यापीठ / शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी मी स्वत: प्रयत्न करेन व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा स्वत: देईल.

७. पदव्युत्तर पदवी किंवा पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा सदर अभ्यासक्रम त्यापुर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधीपुरतेच परदेशात राहण्यास मला परवानगी असेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता परेदशात राहण्यास मला परवानगी मिळणार नाही हे मला मान्य आहे.

८. शासनाकडून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी परदेशातील शैक्षणिक संस्था/विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येकवेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसेच शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका व प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी संचालनालयास सादर करण्यात येईल.

९. प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilization Certificates), खर्चाच्या पावत्या (Receipts) इत्यादी विद्यापीठ/शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांकडुन प्रमाणित करुन संचालनालयास सादर करण्यात येईल.

१०. मी शिक्षण पुर्ण केल्यानंतर मला जेव्हा नोकरी मिळेल, किंवा मी स्वत:चा व्यवसाय सुरु करेल किंवा अभ्यासक्रम पुर्ण केल्यापासून दोन वर्षानंतर यापैकी कमी असलेला कालावधीपासून माझ्या शिक्षणासाठी शासनामार्फत संपूर्ण अभ्यासक्रमासाठी जो खर्च करण्यात आला त्या खर्चाचा कमीत कमी १०% रक्कम मी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्वीय प्रपंजी लेख्या मध्ये जमा करेन.

११. उपरोक्त नमूद केलेल्या सर्व बाबी मला / आम्हाला मान्य असून त्या आम्ही वाचून व समजून घेऊन त्यावर आज दिनांक ------------------- रोजी मुक्कामी सही केली आहे. वरील बाबींपैकी कोणताही बाब खोटी व चुकीची/बनावट आढळल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :
दिनांक : / /२०२१

| सही | सही | सही | सही |
|---|---|---|---|
| (विद्यार्थी) | (पालक) | (जामीनदार) | (जामीनदार) |
| संपूर्ण नांव व पत्ता | संपूर्ण नांव व पत्ता | संपूर्ण नांव व पत्ता | संपूर्ण नांव व पत्ता |
| दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | दूरध्वनी क्र. / मो.क्रं |

# " गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " योजनेसाठीचे

## -हमी पत्र-

## (₹ .१००/- च्या स्टॅम पेपर वर विध्यार्थ्याची अंतिम निवड झाल्यावर सादर करावे )

१. मी ---------------------------------------------------------------- राहणार ---------------------------------------------------------------------------------------------------येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत **" गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती "** योजने अंतर्गत परदेशातील (देशाचे नाव)------------------------- येथे (विद्यापीठाचे नाव) -------------------------------------या विद्यापीठात (कालावधी)----------- वर्षाच्या (अभ्यासक्रमाचे नाव)--------------------------------------- या अभ्यासक्रमासाठी सन---------- या वर्षाकरिता परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने मी संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना खालीलप्रमाणे हमी देत आहे.

२. मी सद्यस्थितीत --------------------------------------------- येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. **(नोकरी करणाऱ्यांसाठी लागू)**

३. अर्जात नमुद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे माझ्यावर बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी वाढीव कालावधीची मागणी करणार नाही.

४. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही.

५. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

६. कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनातर्फे मला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम व्याजासह कुटूंबाच्या मालकीच्या / जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेमधून एक रकमी भरपाई करण्याची अथवा वसुल करण्याची हमी देत आहे.

७. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पुर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची शिष्यवृत्तीची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही.

८. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असताना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करेन. अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाहीस मी पात्र असेन.

९. मला शिक्षण फी व निर्वाह भत्ता यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निधारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च मी स्वत: अदा करेन.

१०. परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसे शैक्षणिक संस्था/विद्यापीठाचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी संचालनालयास सादर करेन.

११. या योजनेखाली निवड झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने परदेशात शिक्षण घेताना नियमाचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास, परदेशीय शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी अथवा वागणूकीविषयी अथवा गैरहजेरी विषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास, विद्यार्थ्याने प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, विद्यार्थ्याने जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेला असल्यास किंवा विद्यार्थ्याने दुसरे विद्यापीठ / शैक्षणिक

संस्थेमध्ये विनापरवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांची ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्यांने विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता परत आल्यास, अशा विद्यार्थ्यास कर्तव्यनिष्ठुर (Defaulter) समजण्यात येईल आणि त्याला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम १२% वार्षिक व्याजाने वसूल करण्यात येईल, अशी हमी देण्यात येत आहे.

कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलींतील तरतूदींचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम / अटी /तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्त्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.

१२. परदेशातील अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर मी भारतात येवून माझ्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी करेन. महाराष्ट्र राज्यात परत येऊन आवश्यकतेनुसार राज्याची सेवा करणे व माझ्या ज्ञानाचा फायदा राज्याला करुन देण्याचीही हमी देत आहे

१३. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकूर मला मान्य असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक- / /२०२१ रोजी----------- मुक्कामी सही केली असे, वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संविधान कलम १९३ (२), १९९, २०० व ४०६ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

स्थळ :
दिनांक : / /२०२१.

| | | | |
|---|---|---|---|
| सही<br>(विद्यार्थी)<br><br>संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | सही<br>(पालक)<br><br>संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | सही<br>(जामीनदार)<br><br>संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | सही<br>(जामीनदार)<br><br>संपूर्ण नांव व पत्ता<br>दूरध्वनी क्र. / मो.क्रं. |

## विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर करण्यासाठीची कागदपत्रांची चेक लिस्ट :-

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे / सहपत्रे |
|---|---|
| १ | विहीत नमुन्यातील Online भरलेला परिपूर्ण अर्ज |
| २ | विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate) (छायांकित प्रत) |
| ३ | विद्यार्थ्याचे आई/वडील अथवा आई, वडील हयात नसल्यास, आणि पालक असल्यास पालकांचा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा दाखला (Domicile Certificate) (छायांकित प्रत) |
| ४ | विद्यार्थ्यांच्या वयासंबंधीचे प्रमाणपत्र (शाळा सोडल्याचा दाखला/ Domicile /SSC प्रमाणपत्र) |
| ५ | इयत्ता १० वी, (SSC) गुणपत्रिका |
| ६ | इयत्ता १० वी, (SSC) प्रमाणपत्र |
| ७ | इयत्ता १२ वी, (HSC) गुणपत्रिका/पदविका गुणपत्रिका |
| ८ | इयत्ता १२ वी, (HSC) प्रमाणपत्र/पदविका प्रमाणपत्र |
| ९ | पदवी गुणपत्रिका |
| १० | पदवी प्रमाणपत्र |
| ११ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका |
| १२ | पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र |
| १३ | GRE (छायांकित प्रत) |
| १४ | TOEFL/IELTS (छायांकित प्रत) |
| १५ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र |
| १६ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचा Form No.16 |
| १७ | विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचा Income Tax Return Form |
| १८ | कुटुंबातील सर्व व्यक्तींचे सर्व मार्गांनी मिळून वर्ष २०२०-२१ करीताचा सक्षम अधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला |
| १९ | परदेशातील विद्यापीठाचे मूळ विनाअट प्रवेशपत्र (Unconditional Offer Letter) |
| २० | USA मधील विद्यार्थ्यांसाठी F-1 (I-20 Certificate) उपलब्ध असल्यास |
| २१ | परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे वार्षिक खर्चाचे अंदाजपत्रक (विद्यापीठाचे पत्र) |
| २२ | आधार कार्ड |
| २३ | शिधा पत्रिका (रेशन कार्ड) |
| २४ | पासपोर्ट |
| २५ | वडील हयात नसल्यास, मृत्यु दाखला |
| २६ | आई-वडील विभक्त असल्यास, न्यायालयाची संबंधित कागदपत्रे |
| २७ | रु. १००/- च्या स्टँप पेपरवर बंधपत्र (निवडीनंतर) |
| २८ | रु. १००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र (निवडीनंतर) |
| २९ | विद्यापीठाच्या माहितीपत्रकाच्या (Prospectus) संबंधित पानांची प्रत |
| ३० | विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न भारतातील बँक खात्याची माहिती (चेक बुक/पासबुक) |
| ३१ | विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य चांगले असल्याचे नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र |

टीप : *१) सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती स्व:साक्षांकित केलेल्या असाव्यात.*

*२) कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती अर्जासोबत जोडू नयेत. ते विभागीय कार्यालयात तपासणीसाठी सादर करावेत.*

# सह संचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालय

| विभाग | कार्यालयाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई मेल, संकेतस्थळ |
|---|---|
| नागपूर | सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर<br>जुने मॉरिस कॉलेज इमारत, सीताबर्डी, नागपूर. पिन कोड: ४४०००१.<br>फोन: ०७१२-२५६१७१३ फॅक्स: ०७१२-२५५४२१०<br>ई-मेल: jdhengp@rediffmail.com<br>संकेतस्थळ : http://dirhe.org.in/jdnagpur/ |
| कोल्हापूर | सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर<br>राजाराम महाविद्यालयात कॅम्पस, विद्यानगर, कोल्हापूर पिन कोड: ४१६००२ ,<br>फोन: ०२३१-२५३५४००/२५३५४५४ फॅक्स: ०२३१-२५३५४००<br>ई-मेल: jtdirhekop@rediffmail.com<br>संकेतस्थळ : http://jdhekop.org/ |
| औरंगाबाद | सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद<br>पदम पुरा स्टेशन रोड, देवगिरी महाविद्यालयाजवळ, औरंगाबाद, पिन कोड: ४३१००१,<br>फोन: ०२४०-२३३१९१३/२३२२९१५<br>ई-मेल: jdheaur_2007@rediffmail.com<br>संकेतस्थळ : http://jdheaurangabad.org.in/ |
| अमरावती | सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती<br>विदर्भ संस्था परिसर, अमरावती पिन कोड: ४४४०६४, अमरावती जिल्हा,<br>फोन: ०७२१-२५३१२३५ फॅक्स: ०७१२-२५३१४५७<br>ई-मेल: jdheamt@yahoo.com<br>संकेतस्थळ :http://www.jdheamravati.org.in/ |
| मुंबई | सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई<br>मुंबई-३ महानगरपालिका मार्ग, (एल्फिन्स्टन तांत्रिक हायस्कूल-परिसर), धोबीतलाव, तळमजला, मुंबई पिन कोड: ४००००१<br>फोन: ०२२-२२६५६६००/२२६९१५२८<br>ई-मेल: glcbhushan@gmail.com<br>संकेतस्थळ : https://jdhemumbai.maharashtra.gov.in/ |
| पुणे | सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे<br>रोझरी शाळा- (लाल देवळा समोर), १७-बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे<br>पिन कोड: ४११००१, पुणे जिल्हा,<br>फोन: ०२०-२६१२७८३३ फॅक्स: ०२०-२६०५१६३२<br>ई-मेल: jdhepune@gmail.com<br>संकेतस्थळ : http://www.jdhepune.gov.in |
| जळगाव | सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पहिला मजला, ग्राहक न्यायालय, जळगाव. पिन कोड: ४२५००९<br>फोन: ०२५७-२२३८५१० फॅक्स: ०२५७-२२३८५१०<br>ई-मेल: jdhe_jal@yahoo.co.in<br>संकेतस्थळ: http://www.jdhejal.org/ |
| नांदेड | सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड<br>शासकीय तंत्रनिकेतनासमोर, यशवंत महाविद्यालय,नांदेड पिन कोड: ४३१६०५<br>फोन:०२४६२-२५३१४४ फॅक्स:०२४६२-२५३१४४<br>ई-मेल: jdhe.nanded@yahoo.co.in<br>संकेतस्थळ: http://jdhenanded.in/home/ |

| | |
|---|---|
| पनवेल | सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल<br>शासकीय अध्यापक महाविद्यालय (परिसर), मुंबई पुणे मार्ग, पनवेल<br>पिन कोड: ४१०२०६, रायगड जिल्हा<br>फोन:०२२-२७४५३८२०/२७४६१४२०<br>ई-मेल: jtdirhe.1115@gmail.com, sachin.pawar1109@gmail.com<br>संकेतस्थळ: http://jdhepanvel.org/ |
| सोलापूर | सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर<br>डी-विभाग, तळमजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सोलापूर,<br>पिन कोड: ४१३००१, सोलापूर जिल्हा<br>फोन: ०२१७-२३२४०५५<br>ई-मेल: jtdirhesol@rediffmail.com |

# सह संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय

| विभाग | कार्यालयाचा पत्ता,दुरध्वनी क्रमांक,ई मेल,संकेतस्थळ |
|---|---|
| मुंबई | सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई<br>४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,बांद्रा (पूर्व),मुंबई ४००० ५१<br>दुरध्वनी ०२२-२६४७४८९२,२६४७१६१९<br>ई-मेल : romumbai@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.jdteromumbai.com |
| पुणे | सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे<br>४१२-ई , शिवाजीनगर,बहिरट पाटील चौक,पुणे ४११०१६<br>दुरध्वनी ०२०-२५६५६२३४,२५६७८९७३<br>ई-मेल : ropune@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.ropune.org.in |
| नाशिक | सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक<br>न्यू पॉलिटेक्नीक एरिया,सामनगाव रोड,नाशिक- ४२२१०१. दूरध्वनी ०२५३-२४६१४७९,२४६०११४<br>ई-मेल : ronasik@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.dtensk.org |
| औरंगाबाद | सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद<br>स्टेशनरोड,उस्मानपूरा,शासकीय तंत्रनिकेतन परिसर,औरंगाबाद,४३१००५<br>दुरध्वनी ०२४०-२३३४२१६,२३३४७६९<br>ई-मेल : roaurangabad@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.dteau.org |
| अमरावती | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती<br>कॉटन मार्केट रोड,शासकीय तंत्रनिकेतन परिसर,अमरावती,४४४६०३. दूरध्वनी ०७२१-२५७३०२७<br>ई-मेल : roamravati@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.jdroamt.org |
| नागपूर | सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर<br>शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर बाजार, नागपूर, ४४०००१. दूरध्वनी ०७१२-२५६५१४३, २५५७२७३<br>ई-मेल : ronagpur@dtemaharashtra.gov.in<br>संकेतस्थळ: http://www.rdtenagpur.org.in |









## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९४१९/४४९/४९३

ई-मेल– desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०४ ऑक्टोबर, २०१८

वाचा : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.ईबीसी-२००३/प्र.क्र.११५/मावक-२, दि.११ जून, २००३
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.ईबीसी-२०१७ /प्र.क्र.२८८/शिक्षण-१, दि.२७ जून, २०१७
३) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.आदिशि-१२०३ /प्र.क्र.७६ / कार्या-१२, दि. ३१ मार्च,२००५
४) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.पशिशि-२०१५ /प्र.क्र.३३४ / कार्या-१२, दि.१६ मार्च,२००६
५) मंत्रिमंडळाच्या दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

आर्थिक परिस्थितीमुळे खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामधील उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते, त्याच धर्तीवर काही सुधारणांसह राज्यातील खुल्या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशातील नामाकिंत विद्यापीठामध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता. त्या अनुषंगाने मंत्रिमंडळाने दिनांक २१ ऑगस्ट,२०१८ रोजी घेतलेल्या निर्णयास अनुसरुन याबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय : -**

महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा २० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. ही योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत "**गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे**" या नावाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात यावी.

## ३. या योजनेची व्याप्ती पुढीलप्रमाणे राहिल :-

ही योजना खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याकरिता लागू राहील. ज्या मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाची परदेशी शिष्यवृत्ती लागू केली आहे अशा मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी त्या-त्या प्रशासनिक विभागाच्या योजनेमध्ये अर्ज करणे अपेक्षित आहे. त्यामुळे अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र असलेले विविध मागास प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व विद्यार्थी या योजनेसाठी खुल्या प्रवर्गाचे विद्यार्थी म्हणून समजण्यात येतील.

## ४. शिष्यवृत्तीची शाखा निहाय विभागणी :-

सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा निहाय मर्यादा प्रत्येक वर्षासाठी निश्चित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | शाखा / अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०१ | ०१ | ०२ |
| २. | वाणिज्य | ०१ | ०१ | ०२ |
| ३. | विज्ञान | ०१ | ०१ | ०२ |
| ४. | व्यवस्थापन | ०१ | ०१ | ०२ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | ०४ | ०४ | ०८ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०१ | ०१ | ०२ |
| | **एकूण** | १० | १० | २० |

५. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३०% जागांवर मुलींची निवड करण्यात येईल.

६. या शासन निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-अ** प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.

७. या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता/अपात्रता , मिळणारे लाभ , शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादीची माहिती सोबतच्या **परिशिष्ट-ब** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

८. या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात रुपये २०.०० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उच्च व तंत्र शिक्षण विभागास स्वतंत्ररित्या मंजूर करण्यात येणार आहे. तसेच या योजनेसाठी

टप्प्याटप्प्याने होणाऱ्या आवर्ती खर्चाचा जास्तीत जास्त रुपये ८०.०० कोटी इतका आर्थिक भार शासनाने मान्य केला आहे. या योजनेसाठी नविन लेखाशीर्ष उघडण्याची व आवश्यक तरतूद करण्याची कार्यवाही स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे. दरम्यान या योजनेसाठी जाहिरात देणे, ऑन-लाईन ॲप्लीकेशन तयार करणे, कंत्राटीतत्वावर आवश्यक त्या नियुक्त्या इत्यादीवर होणारा खर्च संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्या स्वीय प्रपंजी लेख्यातून करण्यात यावा.

९. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून ही योजना महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून राबविण्यात यावी.

१०. हे आदेश नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७७/१४७१, दिनांक ६/९/२०१८ व क्रमांक १९८/१४११, दिनांक १०/९/२०१८ आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७२५/१८/व्यय-५, दिनांक १४/९/२०२१८ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८१००४१६५६०५०५०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.10.04 18:32:42 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई
२२. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माण गांव, जि.रायगड
२४. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२५. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२६. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२७. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२८. सर्व जिल्हाधिकारी
२९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३०. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३४. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३६. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
३७. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३८. निवडनस्ती/तांशि-४.

# शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८
## सोबतचे परिशिष्ट-अ

परदेशी शिष्यवृत्तीकरीता मंजूर करण्यात येणारे अभ्यासक्रम

| **Engineering / Architecture** | **Management** | **Science** | **Arts & Commerce** | **Law** | **Pharamcy** |
|---|---|---|---|---|---|
| *Permissible Courses :- P.G. / P.G. Diploma / Ph.D. | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma / Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma/ Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma/ Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma/ Ph.D | *Permissible Courses :- P.G. / P.G.Diploma /Ph.D |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1.Civil | 1. M.B.A. with Finance / Marketing / H.R. / System Analysis | 1. Agriculture | 1. Sociology | Law | Pharmacy |
| 2.Mechanical | 2. Hotel Management | 2. Horticulture | 2. Psychology | | |
| 3. Electrical | | 3. Animal Husbandry | 3. Philosophy | | |
| 4. Chemical | | 4. General Science | 4. Economics | | |
| 5. Computer | | 5. Maths | 5. Commerce | | |
| 6. Production | | 6. Science | | | |
| 7. Industrial Engg. | | 7. Physics | | | |
| 8. Environmental Engineering | | 8. Chemistry | | | |
| 9. Mining Engg. | | 9. Botany | | | |
| 10. Petrochemical | | 10. Zoology | | | |
| 11. Electronic & TC | | | | | |
| 12. Information Technology/Information System/ Information Science/Computer Engineering | | | | | |
| 13. Bio-Technology | | | | | |
| 14. Genetic Engineering | | | | | |
| 15. Nano Technology | | | | | |
| 16. Industry Internet of Things (IIOT) | | | | | |
| 17. Cyber Law/Cyber Security | | | | | |
| 18. Biomedical Engg. | | | | | |
| 19. Climate Change | | | | | |
| 20. Artificial Intelligence | | | | | |
| २1. Architecture | | | | | |
| **Eligibility** | | | | | |
| Graduation for P.G.,P.G.Diploma & Post Graduation for Ph.D. | Graduation in any subject for P.G.,P.G.Diploma, Graduation in Hotel Management & Post Graduation in Management for Ph.D. | Graduation for P.G.,P.G.Diploma & Post Graduation in Concerned Subject for Ph.D. | Graduation for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Concerned Subject for Ph.D. | Graduation in Law for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Law for Ph.D. | Graduation in Pharmacy for P.G., P.G.Diploma & Post Graduation in Pharmacy for Ph.D. |

* Note:- Only accredited Universities / Institutions of Foreign Countries will only be considered. This is indicative only.

## शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ सोबतचे परिशिष्ट-ब

**१. सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) विद्यार्थी व विद्यार्थ्याचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

२) विद्यार्थ्याला परदेशातील THE/QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा.

३) विद्यार्थ्यांने पदव्युत्तर किंवा पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना यापुर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्रशासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.

४) परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.

५) एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.

६) प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.

७) सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्याकरिता लागू राहील.

**२. वयोमर्यादा :-**

पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची कमाल ३५ वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थीच्या वयाची ४० वर्ष वयोमर्यादा असावी. (दिनांक १ जुलै रोजीचे वय)

**३. उत्पन्न मर्यादा** :-

१. विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुबांचे व विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न **रु. २०.०० लाखापेक्षा जास्त नसावे.**

२. विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. १६ व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार किंवा नायब तहसिलदारपेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागिल आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**४. शैक्षणिक अर्हता** :-

अ) परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

ब) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किंमान ६०% गुणांसहित पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

क) हा पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा.

**५. अभ्यासक्रमाचा कालावधी** :-

१) पीएचडी- ४ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी या पेक्षा जो कमी असेल तो

२) पदव्युत्तर पदवी- २ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

३) पदव्युत्तर पदविका- १ वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा जो कमी असेल तो

**६. एकाच कुटुंबातील कमाल पात्रताधारक** :-

१) सदर योजनेचा लाभ एकाच कुटुंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल.

२) एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांनाही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल.

३) सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही.

**७. अर्ज करण्यासाठी अनिवार्य अटी** :-

१) नोकरीमध्ये असलेल्या उमेदवारांनी तो जेथे नोकरी करतो त्या यंत्रणेचे (organization Employer) ना-हरकत प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य आहे.

२) पात्र विद्यार्थ्याने Non Judicial Stamp Paper वर Public Notary समोर विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

३) विद्यार्थ्याने दोन जामीनदार देणे बंधनकारक असेल. या प्रत्येक जामीनदाराने स्वतंत्र Surety Bond करुन देणे बंधनकारक असेल.

४) अर्ज करणा-या विद्यार्थ्याचे स्वास्थ्य चांगले असले पाहीजे. त्याकरिता त्याने नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

५) विद्यार्थी शिक्षणासाठी आवश्यक असलेला कालावधी किंवा शिक्षण त्यापूर्वी पुर्ण झाल्यास जो कालावधी लागेल या दोघांपैकी जो कमी आहे त्या कालावधी पुरतेच परदेशात राहण्याचे बंधपत्र (Bond) राज्य शासनास तसेच परदेशातील भारतीय दूतावासास लिहून द्यावे लागेल. या आवश्यक कालावधीपेक्षा जास्त कालवधीकरीता परदेशात राहण्यास विद्यार्थ्यांस परवानगी मिळणार नाही.

६) विद्यार्थ्यास शासनाने विहीत करुन दिलेल्या नमुन्यात Record Release Consent Form हा बंधपत्राच्या स्वरुपात द्यावा लागेल.

७) विद्यार्थ्यांस परदेशामध्ये प्रवेश मिळण्यासाठी THE/किंवा QS World Ranking मधील २०० च्या आतील अद्ययावत जागतिक क्रमवारीत असलेल्या विद्यापीठ/शिक्षणसंस्था मध्ये प्रवेशासाठी स्वत: प्रयत्न करावा लागेल व त्यासाठी आवश्यक त्या सर्व पात्रता परीक्षा देणे बंधनकारक असेल.

८) ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्थांकडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही.

९) विवाहीत उमेदवाराच्या पत्नी व मुले यांना परदेशामध्ये सोबत घेवून जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचे सहाय्य दिले जाणार नाही. त्यासाठी पासपोर्ट मिळविणे, व्हिसा मिळविणे, आर्थिक तरतुद करणे, परदेशातील निवास व दैनंदिन खर्चाची व्यवस्था करणेही उमेदवाराची वैयक्तिक जबाबदारी असेल.

१०) नोकरी करणाऱ्या उमेदवारांनी सर्व प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वत: प्रत्यक्षपणे निराकरीत करावयाच्या आहेत. याबाबत कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून मिळणार नाही.

११) (अ) अचानक उध्दवलेल्या परिस्थितीमध्ये, परदेशामध्ये शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यास भारतामध्ये यावयाचे असल्यास त्यासाठी त्याचे संबंधित शैक्षणिक संस्था आणि संबंधीत शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल आणि याबाबतची माहिती संबंधित विद्यार्थी भारतीय दूतावासास कळवतील.

(ब) जेवढया कालावधीमध्ये परदेशातील शैक्षणिक संस्थेमधून दूर असेल, तेवढया कालावधीचा कोणताही खर्च त्यास अनुज्ञेय होणार नाही. तथापि, तो पुन्हा त्याच शैक्षणिक संस्थेत त्याच अभ्यासक्रमाचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी हजर झालेल्या दिवसापासून त्यास देय लाभ अनुज्ञेय होतील.

(क) अशा परिस्थितीत विद्यार्थ्याने परत त्याच परदेशी शिक्षण संस्थेमध्ये हजर न होता शिक्षण अर्धवट सोडल्यास त्यास अदा करण्यात आलेले शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इतर शुल्क व निर्वाहभत्त्याची व्याजासह वसूली करण्यात येईल, याबाबतचे लेखी **<u>हमीपत्र</u>** विद्यार्थ्यास द्यावे लागेल.

१२) पासपोर्ट व व्हिसा मिळविण्याची जबाबदारी उमेदवार/विद्यार्थ्याची असेल,

१३) उमेदवारास/विद्यार्थ्यांना केवळ ज्या शैक्षणिक संस्थेमध्ये, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेला आहे व शिष्यवृत्ती मिळाली आहे त्याच कारणासाठी व्हिसा घेणे बंधनकारक असेल.

१४) निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी मागणी केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे व आवश्यक ते करारनामे देणे बंधनकारक असेल.

१५) निवड झालेल्या विद्यार्थ्यास त्याच्या शैक्षणिक कालावधीमध्ये जास्तीची रक्कम अदा झाली असल्यास त्याची परतफेड करणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल. अथवा ती वसूल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक असेल.

१६) सदर शिष्यवृत्तीच्या बाबत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

१७) परदेशी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी शिष्यवृत्ती देण्याकरिता एक स्वतंत्र स्वीय प्रपंजी लेखा (PLA) तंत्रशिक्षण संचालक, यांचेकडे उघडण्यात येईल. त्यामध्ये समाजातील दानशूर व्यक्ती

तसेच या योजनेचा लाभ घेऊन नोकरी/व्यवसाय करणा-या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारी रक्कम जमा करण्यात येईल. या निधिचा उपयोग केवळ परदेशी शिष्यवृत्तीसाठी करण्यात येईल.

१८) विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर जेव्हा त्यांना नोकरी मिळेल, किंवा तो स्वतःच्या व्यवसाय सुरु करेल किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यापासून दोन वर्षानंतर यापैकी कमी असलेल्या कालावधीपासून त्याच्या शिक्षणासाठी शासनामार्फत जो खर्च करण्यात आला आहे, त्याखर्चाच्या साधारण १०% रक्कम महाराष्ट्र शासनाच्या यासाठी उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये जमा करावी लागेल. जेवढी रक्कम विद्यार्थी जमा करतील तेवढीच रक्कम महाराष्ट्र शासन निधी मध्ये जमा करील व त्याचा विनियोग याच प्रयोजनासाठी करण्यात येईल.

१९) या शिष्यवृत्तीचा लाभ घेवून पूर्ण करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाचा लाभ राज्य शासनास होणे या योजनेमध्ये अपेक्षित आहे.  त्यामुळे ज्या शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांने महाराष्ट्र राज्यात परत येवून त्याचा अभ्यासक्रमाचा लाभ राज्यास होईल याकरीता आवश्यकतेनुसार राज्य शासनास सेवा देणे अपेक्षित आहे.  त्याबाबतचे बंधपत्र लाभार्थी विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.

## ८. विद्यार्थ्यास मिळणारे लाभ:-

परदेशी शिष्यवृती मंजूर करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास खालील लाभ देण्यात येतील.

१) परदेशातील शैक्षणिक संस्थेने पत्रामध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे किवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत थेट संबधित शैक्षणिक संस्थेस अदा करण्यात येईल.

२) प्रवेश घेतलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेल्या अथवा भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च अथवा महाराष्ट्र शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी जाहीर करेल ती रक्कम ही निर्वाह भत्ता म्हणून संबंधित विद्यार्थ्याच्या परदेशातील वैयक्तीक खात्यामध्ये जमा केला जाईल.

३) विद्यार्थ्यास परदेशी शिक्षण संस्थेमार्फत किंवा इतर कोणत्याही यंत्रणेमार्फत मिळणारी शिष्यवृत्ती, इतर कोणत्याही प्रकारचे आर्थिक लाभ किंवा शिकविण्याबाबतचे मानधन किंवा फेलोशिप किंवा रिसर्च असोशिएट म्हणून मिळणारी ही रक्कम देय होणाऱ्या शिक्षण शुल्क वा एकूण देय रक्कमे मधून कपात करण्यात येईल.

४) विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रमपुर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जवळच्या मार्गाचा (Shortest Route) दराचा इकोनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा दर दिला जाईल.

५) विद्यार्थ्यांस परदेशात राहण्याच्या कालावधीसाठी विद्यापीठाने ठरवून दिल्यानुसार वैयक्तिक आरोग्य विमा (Personal Health Insurance) काढणे अनिवार्य राहील. यासाठीचा संबंधीत विद्यापीठाच्या निकषानुसार किमान खर्च शासनाकडून अनुनेज्ञ राहील.

६) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क, निर्वाहभत्ता, वैयक्तिक आरोग्य विमा आणि यासाठी निर्धारीत केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निर्धारीत दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च विद्यार्थी/उमेदवारास स्वत: सोसावा लागेल व अशा प्रकारचे **<u>हमीपत्र</u>** विद्यार्थ्यास व पालकास अर्जासोबत दयावे लागेल.

७) खालील बाबींवरील खर्च अनुज्ञेय राहणार नाही:

i. व्हिसा अर्जावरील खर्च
ii. विद्यार्थ्याच्या कुटूंबातील सदस्यांचा प्रवास व इतर खर्च
iii.नियमित शिक्षणाच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अभ्यासक्रम अथवा प्रशिक्षणावरील खर्च
iv. भाषा प्रशिक्षणावरील खर्च
v. नियमित अभ्यासक्रमाच्या कालावधीत अतिरिक्त प्रवासाचा खर्च
vi.संशोधन, पुरक शैक्षणीक साहित्य, क्षेत्र भेटी, कार्यशाळा/सेमिनार, आंतरवसियता (Internship) यामधील सहभागाचा खर्च.
vii. संगणक व तत्सम शैक्षणिक साहित्य.

८) विद्यार्थ्यास वरील लाभ मिळण्यासाठी परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे बंधनकारक असून, तसे शैक्षणिक संस्था / विद्यापीठाचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

९) प्रवेशित विद्यार्थ्यांने प्रत्येक सहा महिन्याच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे (Utilisation Certificate), खर्चाच्या पावत्या इ. विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाकडून प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील हप्ता मंजूर होणार नाही.

१०) सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहीत कालावधीत अभ्यासक्रमपूर्ण केल्यानंतर त्वरीत कालमर्यादेत भारतात परत येण्यासाठी नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल. त्यासाठी विमान प्रवासाचे मूळ तिकीट, मूळ बोर्डींग पास, परतीचे प्रवास भाडे मिळण्यासाठी अभ्यासक्रम विहीत कालावधीत यशस्वीपणे पूर्ण केल्याचा पुरावा इ.कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

११) अपवादात्मक प्रसंगी, विद्यार्थ्यांनी / पालकांनी, परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठ, शिक्षण फी / इतर अनुज्ञेय फी स्वत: भरलेली असेल, अशा वेळी आवश्यक त्या पावत्या व पुरावे सादर केल्यानंतर, अशी रक्कम विद्यार्थ्यास देय होणाऱ्या शिष्यवृत्ती मधून विद्यार्थ्यांच्या परदेशातील

खात्यावर जमा करणेसाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१२) विद्यार्थ्यांने भारतात राष्ट्रीयकृत बँकेत व परदेशात अधिकृत बँकेत खाते उघडणे अनिवार्य आहे. त्याच खात्यावर त्यांना देय होणारी शिष्यवृत्ती CMP किंवा RTGS किंवा SWIFT ने अदा केली जाईल. या खात्याचा तपशिल त्यांने परदेशात जाऊन प्रवेश घेतल्या नंतर तात्काळ संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावा. तसेच शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी आवश्यकतेनुसार मागणी केल्यास विद्यार्थ्यांने संबंधित बँक खात्याचा तपशिल संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावा.

१३) परदेशी शिक्षण संस्था / विद्यापीठाने ऑफर लेटर मध्ये संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीच्या निर्धारीत केलेल्या फी च्या मर्यादेतच लाभ संबंधीत विद्यार्थ्यास अनुज्ञेय होतील. भविष्यात त्यामध्ये वाढ झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्तालयाच्या शिफारशीनंतरच ही वाढ संबंधित विद्यार्थ्यास अनुज्ञेय राहील.

## ९. **कर्तव्यात कसूर** (Default under the scheme) :-

१) या योजनेखाली निवड झालेल्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने परदेशात शिक्षण घेताना नियमाचे तसेच अटी व शर्तीचे आणि बंधपत्रामध्ये लिहून दिलेल्या बाबींचे उल्लंघन केल्यास, परदेशीय शैक्षणिक संस्थेने अभ्यासाविषयी अथवा वागणूकीविषयी अथवा गैरहजेरी विषयी प्रतिकूल अहवाल दिल्यास, विद्यार्थ्याने प्रवेश अर्धवट सोडला असल्यास, विद्यार्थ्याने जेथे प्रवेश घेतला आहे तो देश सोडून निघून गेला असल्यास किंवा विद्यार्थ्याने दुसरे विद्यापीठ / शैक्षणिक संस्थेमध्ये विनापरवानगी प्रवेश घेतला असल्यास, किंवा विद्यार्थ्यांची ज्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे, तो अभ्यासक्रम त्यांने विनापरवानगी बदलल्यास, किंवा तो भारतात कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता परत आल्यास, अशा विद्यार्थ्यास कर्तव्यनिष्ठुर (Defaulter) समजण्यात येईल आणि त्याला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम १२% वार्षिक व्याजाने वसूल करण्यात येईल, अशा प्रकारचे संयुक्त हमीपत्र विद्यार्थी व पालक यांनी सादर करणे आवश्यक राहील.

२) कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहित प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाभ मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, सदर नियमावलीतील तरतुदीचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम/ अटी/ तरतूदीचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणिक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड, शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचविणे, भारताची बदनामी करणे याबाबी कर्तव्यातील कसूर

समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केलेल्या विद्यार्थ्यास / उमेदवारास अपात्र ठरवून त्याच्या परदेश शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ व्याजासह वसूल केले जातील.

**१०. अर्ज करण्याची पध्दती** :-

१) सदर शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक वर्षी एप्रिल / मे महिन्यात संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेशी विचार विनिमय करून प्राधिकृत केलेल्या यंत्रणेमार्फत वृत्तपत्रात तसेच शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करतील. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता ही कार्यवाही सप्टेंबर / ऑक्टोबर, २०१८ मध्ये करण्यात येईल.

२) सदरची योजना या शासन निर्णयातील नियमावली, अटी व शर्ती नुसार राबविण्यासाठी शासन प्राधिकृत करेल त्या यंत्रणेकडुन अथवा संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई / संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत राबविण्यात येईल.

३) सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा शासन निर्धारित करेल इतक्या कालावधीत विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह ऑनलाईन सादर करावेत. अभ्यासक्रमनिहाय असलेल्या क्षमतेच्या अधिन राहून, निवड समितीने निश्चित केलेली पात्र विद्यार्थ्यांची अंतिम निवड यादी साधारणतः दिनांक १ जुलै पूर्वी अथवा निवड समितीच्या निर्णयानंतर शासन जाहीर करेल. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता अंतिम निवड यादी नोव्हेंबर, २०१८ मध्ये जाहीर करण्यात येईल.

४) शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संबंधीत शिक्षण संचालनालय संबंधित विद्यार्थ्यांना कळवून त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती मागविण्यात येईल. तसेच या विद्यार्थ्याची गृह चौकशी करण्यात येईल.

५) दिनांक १५ जुलैपर्यंत संबंधित विद्यापीठाकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन त्यानंतर १५ दिवसाच्या आत विद्यार्थ्यांना संबंधित परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यकतेनुसार अग्रिम मंजूर करण्यात येईल. तथापि, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता निधी उपलब्ध होईपर्यंत हा कालावधी आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल.

६) विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेवून आवश्यक ती माहिती व अग्रीम रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र/ पोचपावती संबंधित परदेशी शैक्षणिक संस्थेकडून प्रमाणित होऊन प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांस त्या वर्षीचे अग्रिम समायोजित करुन पहिला अर्ध वार्षिक हप्ता अदा करण्यात येईल.

७) प्रत्येक सहा महिन्याने विद्यार्थ्यानी दिलेल्या शिष्यवृत्तीचे (शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता इ.चे) उपयोगिता प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल संचालक, तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/पुणे यांना सादर केल्यानंतर पुढील ६ महिन्याची शिष्यवृत्ती अदा करण्यात येईल. प्रत्येक ६

महिन्याला विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र/खर्चाचा अहवाल प्राप्त झाल्याशिवाय संबंधित विद्यार्थ्यास पुढील शिष्यवृत्ती अनुज्ञेय होणार नाही.

८) सदर अर्जासोबत विद्यार्थ्याने खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे:-

(i) विहीत नमुन्यातील परिपुर्ण अर्ज,
(ii) सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला,
(iii) पदवी / पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे. (सनद/मार्कलिस्ट),
(iv) परदेशातील THE/QS World Ranking २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट (Unconditional) ऑफर लेटर,
(v) ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची (Prospectus) प्रत.
(vi) आवश्यक ते करारनामे व हमीपत्रे.
(vii) दोन भारतीय नागरीकांचे जामीनपत्र,
(ix) संपूर्ण अभ्यासक्रम पुर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.
(x) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत.
(xi) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत THE/QS World Ranking चीजागतिक क्रमवारी.

**११. गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती :-**

१) शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणा-या विद्यार्थ्यांपैकी इतर सर्व अटींची पूर्तता होणा-या विद्यार्थ्यांच्या प्राप्त गुणांचे मुल्यांकन खालील प्रमाणे करून त्याचे एकूण गुण विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी:

**अ. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाकरिता :**

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम | प्राप्त केलेले गुण | गुणांचे मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १. | SSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | HSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | ३० |
| ४. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ५० |
| | | ५१ ते १०० | ४० |
| | | १०१ ते १५० | ३० |
| | | १५१ ते २०० | २० |

**आ. डॉक्टरेट अभ्यासक्रमाकरिता :**

| **अ.क्र.** | **उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम** | **प्राप्त केलेले गुण** | **गुणांचे मुल्यांकन** |
|---|---|---|---|
| १. | SSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| २. | HSC | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ८०% | ५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | १० |
| ३. | पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ४. | पदव्युत्तर पदवी | ६० % पेक्षा कमी | ० |
| | | ६० ते ७०% | ५ |
| | | ७१ ते ८०% | १५ |
| | | ८०% पेक्षा जास्त | २० |
| ५. | THE and QS World Ranking Average | १ ते ५० | ४० |
| | | ५१ ते १०० | ३० |
| | | १०१ ते १५० | २० |
| | | १५१ ते २०० | १० |

२) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ प्रमाणे अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी प्रवेश संख्या निर्धारीत केलेली असून त्या मर्यादेत विद्यार्थ्याची निवड करावयाची आहे. त्यामुळे, निर्धारीत केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथमत: वरील “अ” व “आ” करीता दोन स्वतंत्र एकत्रित गुणवत्ता याद्या तयार कराव्यात.

३) अ) गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी THE/QS World Ranking जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे.

ब) त्यानंतरही समसमान गुण असल्यास पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदवी अभ्यासक्रमाचे आणि पीएचडी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेण्यात यावेत.

क) त्यानंतरही समसमान गुणवत्ता असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास वरचे स्थान देण्यात यावे.

४) मात्र, गुणवत्ता यादीमध्ये समसमान गुणवत्ता असलेल्या अभियांत्रिकी व विज्ञान या शाखेच्या प्रकरणी वरील ३ ब) व ३ क) चा विचार न करता या विद्यार्थ्याची निवड करताना Emerging areas of science and technology चा प्राधान्याने विचार केला जाईल. उदा. Atmospheric sciences, Adaptation and mitigation of Climate Change, Automation and Artificial Intelligence, Renewable Engergy, Energy Efficiency Techniques, Biotechnology, Nano Technology, Industry Internet of Things, Basic Analytics इ. अभ्यासक्रमांना प्राधान्य दिले जाईल.

५) गुणवत्ता याद्या तयार केल्यानंतर शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ प्रमाणे शाखानिहाय पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्यात यावी. ही निवड करताना एकूण लाभार्थी विद्यार्थ्यांमध्ये ३०% विद्यार्थिनींची निवड करणे आवश्यक आहे. त्यामुळे निवड यादीत निर्धारित प्रमाणात विद्यार्थिनींचा समावेश होत नसल्यास संभाव्य निवड यादीतील उतरत्या क्रमानुसार शेवटच्या विद्यार्थ्या ऐवजी त्याच शाखेच्या विद्यार्थिनीची निवड करण्यात यावी. ही कार्यवाही करीत असतांना अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र शाखेकरीता एकापेक्षा जास्त विद्यार्थिनींची निवड करणे अपेक्षित नाही.

६) पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पीएचडी अभ्यासक्रमाच्या जागेवर निवड यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

७) पीएचडी अभ्यासक्रमासाठी जर एखाद्या शाखेमध्ये उमेदवार उपलब्ध झाला नाही तर त्या वर्षापुरते त्याच शाखेमधील पदव्युत्तर पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या जागेवर निवड यादीतील जेष्ठता क्रमानुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

८) तथापि, त्यानंतरही पदव्युत्तर अभ्यासक्रम/डॉक्टरेटसाठी विहीत करण्यात आलेल्या जागेवर पुरेशा संख्येने विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास/पात्र न ठरल्यास शासन निर्णयाच्या परिच्छेद-४ मधील उतरत्या क्रमवारीनुसार लगतच्या शाखेतील जागा (Vertical Interchange) भरण्याचे अधिकार निवड समितीस राहतील. मात्र, त्यासाठी निवड यादीतील जेष्ठता हा निकष कायम असेल.

९) निवड यादीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

**१२. अन्य अटी व शर्थी :-**

१) परदेशात अभ्यासक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्याने दोन महिन्याच्या आत संचालक, तंत्रशिक्षण/ संचालक, उच्च शिक्षण यांना अंतिम परिक्षेचे गुणपत्र, प्रमाणपत्र आणि प्रगती अहवाल व पदवीदान समारंभाचे छायाचित्रासह माहिती सादर करणे बंधनकारक असेल. त्याशिवाय विद्यार्थ्यास अंतिम विमान प्रवास व इतर लाभ दिले जाणार नाहीत.

२) अभ्यासक्रम संपल्यानंतर या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यास व्हिसा मुदतवाढीसाठी परवानगी दिली जाणार नाही. अभ्यासक्रमाचा कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढल्यास त्यास अतिरिक्त निधी दिला जाणार नाही.

३) ज्या विद्यापीठामध्ये/शैक्षणिक संस्थेमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला आहे, ते विद्यापीठ/ शैक्षणिक संस्था ही त्या देशातील मान्यताप्राप्त विद्यापीठ/शैक्षणिक संस्था असावी. (Acccredited Universtiy/ Institute) या सबंधीची कागदपत्रे अर्जासोबत सादर करावी. या बाबत काही वाद निर्माण झाल्यास परदेशातील भारतीय उच्चायुक्त यांचे कडून खात्री करुन निवड समिती त्याबाबत निर्णय घेईल.

४) अर्जात नमूद केलेले विद्यापीठ अभ्यासक्रमासाठी काही कारणास्तव विद्यार्थी प्रवेश घेवू शकत नसल्यास, त्याच विद्यापीठात त्याच अभ्यासक्रमासाठी पुढील एका सत्राचा (६ महिन्याचा) कालावधी, कोणतेही अतिरीक्त शुल्क न आकारता संबंधित विद्यापीठ अथवा शैक्षणिक संस्थेने विनाअट वाढवून दिल्यास आणि विद्यार्थ्याने त्यासाठी सबळ कारण/पुरावा सादर केल्यास अशी मुदतवाढ देण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना असतील. तदनंतर विद्यार्थ्यास आणखी मुदतवाढ मिळणार नाही.

५) एकदा निवड झालेले विद्यापीठ व अभ्यासक्रम कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. मात्र, सबलीकरण विचारात घेवून अशा बदलास मान्यता देण्याचे अधिकार शासनास राहतील.

६) निवड झालेल्या विद्यार्थ्याला विद्यापीठात प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ काही अगावू रक्कम भरण्याची आवश्यक असल्यास, अशा आगावू रकमेस मान्यता देण्याचे अधिकार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना राहतील, मात्र, ही आगावू रक्कम पुढील देय हप्त्यामध्ये समायोजित करण्यात यावी.

७) विद्यार्थ्यांना अर्ज करते वेळी विद्यापीठाकडून मान्य करुन घेतलेल्या संपूर्ण अभ्यासक्रमासाठीच्या कालावधीच्या शिक्षण फी, इतर फी, निवास व भोजनखर्च, निर्वाहभत्ता, आकस्मिक खर्चाची जी महिती सादर केली आहे, त्यापेक्षा जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

८) अभ्यासक्रमाच्या कालावधी व्यतिरीक्त कोणत्याही परिस्थितीत वाढीव कालावधीच्या व्हिसासाठी मान्यता देण्यात येणार नाही.

९) विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे, याची लेखी माहिती संचालक, तंत्रशिक्षण/संचालक, उच्च शिक्षण यांना सादर करणे आवश्यक आहे. ही माहिती न देता विद्यार्थी परदेशात गेल्यास त्यास विमान खर्च अनुज्ञेय होणार नाही.

१०) आवश्यकतेनुसार विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, उपस्थिती, वर्तणूक, खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व इतर तद्नुषंगिक बाबींचा अहवाल परदेशातील भारतीय दूतावासाकडून प्राप्त करुन घेण्यात येईल.

११) अभ्यासक्रमाचा कालावधी संपल्यानंतर परदेशातील वास्तव्यासाठी कोणताही पत्रव्यवहार संचालनालयामार्फत केला जाणार नाही, अथवा विद्यार्थी/पालक यांचा पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१२) परदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) TOEFL (Test of English as a foreign language), IELTS (International English Langaugae Testing System) इ. प्रकारच्या परीक्षा जेथे अनिवार्य आहेत, त्या उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यावर बंधनकारक असेल.

१३) विद्यार्थ्यांने शिष्यवृत्तीसाठी अर्जामध्ये नमूद केलेले विद्यापीठ व अभ्यासक्रम त्यांचा कालावधी आणि खर्चाचे तपशिल यामध्ये निवड समितीने निवडीची शिफारस केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

१४) काही कारणास्तव विद्यार्थ्यास त्याची निवड होवूनही त्या वर्षी प्रवेश घेता आला नाही, तर त्यास वयोमर्यादेच्या अधिन राहून पुढील वर्षी नव्याने अर्ज करण्याची मुभा राहील.

१५) परदेशातील भारतीय दुतावासात राज्य शासनाकडून संबंधित विद्यार्थ्यांचा प्रगती अहवाल, वर्तणूक खर्चाचा हिशोब इ. माहिती पुरविण्याबाबत विनंती करण्यात येईल. तसेच काही विपरीत बाबी असल्यास, परदेशातील भारतीय दूतावास त्या बाबी राज्य शासनास कळवतील. परदेशात प्रवेशित विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी मार्गदर्शन व सल्ला देणेबाबत परदेशातील दुतावासास विनंती करण्यात येईल. त्याचबरोबर या विद्यार्थ्यांना परदेशात काही अडचणी उद्भवल्यास मदत करण्यासाठी या दुतावासास विनंती करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात/शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर तात्काळ तेथील भारतीय परदेशी दूतावासास संपर्क साधून आपली नोंदणी करावी व त्याचा तपशिल संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सादर करावा.

१६) पीएचडी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांने ज्या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे त्याविषयाचा, भारतामध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये अंतिम प्रबंध अहवाल (Thesis) सादर केला नसल्याबाबतचे घोषणापत्र (Declaration) सादर करणे आवश्यक आहे.

१७) तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी व दर्जावाढीसाठी आवश्यक असलेले शिथीलीकरण करण्याचे अधिकार यापुर्वीच्या शैक्षणिक वर्षासह संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना असतील.

**१३. खोटी माहिती सादर करणे** :-

कोणत्याही विद्यार्थ्याने खोटी माहिती/कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त परिच्छेद “९” प्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी

अटकाव (Debarred) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची १५% चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी/उमेदवाराचा काळ्या यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/ व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल.

**१४. कायदेशीर बाबी** :-

या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवल्यास कायदेशीर बाबीसाठी परदेशातील उच्चायुक्त कार्यवाही करतील.

**१५. छाननी समिती** :-

या शिष्यवृत्तीसाठी विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती असेल :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संचालक, तंत्र शिक्षण | - | अध्यक्ष |
| २. | सह / उपसचिव,तंत्रशिक्षण किंवा सह / उप सचिव, उच्च शिक्षण | - | सदस्य |
| ३. | सहसंचालक, उच्च शिक्षण | - | सदस्य |
| ४. | सहसंचालक, तंत्र शिक्षण | - | सदस्य सचिव |

उपरोक्त समिती प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन अभ्यासक्रम निहाय पदव्युत्तर पदवी व डॉक्टरेटसाठी राखीव कोटयानुसार आणि परदेशातील विद्यापीठ/ शैक्षणिक संस्थेच्या जागतिक क्रमवारीच्या जेष्ठतेनुसार पात्र विद्यार्थ्याचे प्रस्ताव निवड समितीकडे अंतिम करण्यासाठी पाठवेल.

**१६. निवड समिती** :-

उपरोक्त छाननी समितीमार्फत प्राप्त झालेल्या विद्यार्थ्याच्या यादी/प्रस्तावामधून पात्र विद्यार्थ्याची निवड यादी तयार करणेसाठी निवड समितीची रचना खालील प्रमाणे असेल :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | - | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त | - | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता | - | सदस्य |
| २. | संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई | - | सदस्य सचिव |
| ३. | संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे | - | सदस्य |
| ४. | सह/उप सचिव, उच्च शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | - | सदस्य |
| ५. | सह/उप सचिव, तंत्र शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण विभाग | - | सदस्य |
| ६. | आयआयटी, पवई, मुंबई या संस्थेचा किमान प्राध्यापक दर्जाचा प्रतिनिधी | - | सदस्य |

गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी
शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ६ सप्टेंबर, २०२१

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.४ ऑक्टोबर, २०१८
२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.१२ नोव्हेंबर, २०१८
३) शासन शुध्दिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.२१८/१/ तांशि-४, दि.११ फेब्रुवारी, २०१९
४) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/ २/तांशि-४, दि.११ फेब्रुवारी, २०१९
५) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.९/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२०/३८, दि.११ ऑगस्ट, २०२०

**<u>प्रस्तावना</u> :-**

आर्थिक परिस्थितीमुळे खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामधील उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागातर्फे शिष्यवृत्ती देण्यात येते, त्याच धर्तीवर काही सुधारणांसह राज्यातील खुल्या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशातील नामाकिंत विद्यापीठामध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्याची योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात येत आहे कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणाऱ्या अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ४/५/२०२० अन्वये करण्यात आलेल्या उपाय योजनांमुळे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये राबविण्यात आली नाही. ही योजना काही सुधारणांसह शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राबविण्याचे शासनाचे विचाराधीन होते.

**<u>शासन निर्णय</u> :**

"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्याची व त्याच्या पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून रुपये ८.०० लक्ष इतकी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे ही योजना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता न राबविता आता ती थेट शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता राबविण्यात यावी. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता अर्ज करण्याची संधी देण्यात यावी. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये परदेशातील विद्यापीठांमध्ये मान्य अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या ज्या विद्यार्थ्यांची या योजनेसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता निवड होईल त्या विद्यार्थ्यास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (प्रथम वर्ष) वगळता त्या पुढील अभ्यासक्रमाच्या उर्वरित मान्य कालावधीसाठी शिष्यवृत्ती देय ठरेल.

३. या व्यतिरिक्त या योजनेकरीता विहित करण्यात आलेल्या उर्वरित अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर २० प्रवेश क्षमतेकरीता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता सदर योजना संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. संचालक, तंत्र शिक्षण यांनी याबाबत यापूर्वीच्या कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक.६६२/२०२१/व्यय-५,दिनांक २२/७/२०२१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक **२०२१०९०७११००१९२८०८** असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by NITIN JYOTINATH GHIRATKAR
Date: 2021.09.07 12:35:51 +05'30'

**( नि.ज्यो.घिरटकर )**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई

७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
९. सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१९. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई
२२. कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२३. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माण गांव, जि.रायगड
२४. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
२५. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२६. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२७. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
२९. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई / नागपूर
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
३३. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३४. अवर सचिव (तांशि-३, विशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. कक्ष अधिकारी(मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१),उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
३६. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३७. निवडनस्ती/तांशि-४